# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, कर्मचा-यांच्या अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीविषयक विनिमय, १९६८

पत्र क्रमांक आय्. डी. सी. १०६८-२९१९०-आय्. एन्. डी. आय्.
दिनांक २९ जून १९६८ अन्वये महाराष्ट्र शासनाने
मान्यता दिलेले


मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई, यांनी
शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यात छापून प्रसिद्ध केले
१९७०

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कर्मचा-यांच्या अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीविषयक विनिमय, १९६८

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कर्मचा-यांच्या अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीविषयक विनिमय, १९६८

महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३) याचे कलम ६४, पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये मिळालेले अधिकार चालवून महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ महाराष्ट्र शासनाची आगाऊ संमती घेऊन पुढील विनियम करीत आहे :-

१. **संक्षिप्त शीर्षक, सुरुवात व लागू करणे.** – (अ) या विनियमांना महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कर्मचा-यांच्या अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीविषयक विनियम, १९६८ असे संबोधले जावे.

(ब) हे विनियम, दिनांक १ एप्रिल १९६८ पासून अंमलात येतील.

(क) हे विनियम महामंडळाकडे प्रतिनयुक्त करण्यांत आलेले, मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व शासकीय कर्मचारी यांच्या व्यतिरीक्त मंहामंडळाच्या सर्व कर्मचाऱ्याना लागू होतील.
(विश्वस्त मंडळाची सभा क्रमांक ५ दि. ६-४-७१ मधील उराव क्र.३१ बी)

२. **व्याख्या.** – या विनियमांत, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर –

(अ) [ ही व्याख्या गाळण्यात आली आहे ]*

(ब) 'अधिनियम' या संज्ञेचा अर्थ महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अधिनियम, १९६१ असा होय;

(क) 'मंडळ' या संज्ञेचा अर्थ या विनियमांन्वये अस्तित्वात आलेले विश्वस्त मंडळ होय ;

(ड) 'अध्यक्ष' या संज्ञेचा अर्थ महामंडळाचा अध्यक्ष असा होय;

(इ) 'अंशदान' या संज्ञेचा अर्थ या विनियमांन्वये महामंडळाने मालक या नात्याने कर्मचा-यांच्या भविष्य निर्वाह निधी खात्यात भरावयाचे व्याजाव्यतिरिक्त अन्य कोणतेही अंशदान होय;

(फ) 'महामंडळ' या संज्ञेचा अर्थ अधिनियमान्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ होय;

(ग) 'प्राप्ती' या संज्ञेचा अर्थ मूळ पगार, वैयक्तिक पगार, खास पगार, (रजेचा पगार) व महागाई भत्ता असा होय;

---

[ ]* ठराव क्र. ८ [ ]† ठराव क्र. १०

(ह) कर्मचारी या संज्ञेचा अर्थ जो-महामंडळाच्या सेवेत नोकरीस आहे व ज्यास प्रत्यक्ष महामंडळाकडून पगार मिळतो, तसेच रोजंदारी तत्वावर नोकीवर असलेला असा, व मुख्यकार्यकारी अधिकारी, मुख्यलेखाधिकारी, शासनाकडून अथवा इतर कोणत्याही संस्थेकडून महामंडळाकडे प्रतिनियुक्त करण्यांत आलेल्या इसमाव्यतिरीक्त कोणताही इसम असा होय. परंतु त्यांत ठेकेदारमार्फत कामावर ठेवण्यांत आलेल्या अथवा प्रशिक्षणासाठी कामावर ठेवण्यांत आलेल्या तसेच पुन्हा कामावर ठेवलेल्या सेवानिवृत्त इसमाचा तसेच अंशकालीन तत्वावरील कर्मचाऱ्याचा सामवेश होणार नाही.(विश्वस्तमंडळाची सभा क्र ५ दि. ६-४-७१, ठराव क्र.३१)

(आय्) 'मालक' या संज्ञेचा अर्थ महामंडळ असा होय;

(जे) 'कुटुंब' या संज्ञेचा अर्थ,—

(१) पुरुष सदस्याच्या बाबतीत त्याची बायको, औरस पुत्र, औरस अविवाहित मुली व त्याच्यावर अवलंबून असलेले त्याचे आईवडील असा होय व त्यात त्याच्या मरण पावलेल्या मुलाची विधवा बायको व मुले यांचा समावेश होतो.

मात्र असे की, अशा सदस्याने त्याचे नियमन करणाऱ्या व्यक्तीविधीअन्वये अथवा ती नवरा-बायको ज्या समाजांची असतील त्या समाजाच्या रूढ कायद्याअन्वये त्याच्या बायकोस त्याजकडून पोटगी मिळण्याचा हक्क आता उरलेला नाही असे सिद्ध केल्यास व त्याने नंतर आपल्या पत्नीस आपल्या कुटुंबाचा भाग म्हणून समजली जावी अशी लेखी सुस्पष्ट नोटीस पाठवून मंडळास कळविले नसेल तर ती अशा सदस्यांच्या कुटुंबाचा भाग म्हणून त्यापुढे समजली जाणार नाही; आणि

(२) स्त्री सदस्याच्या बाबतीत, अशा सदस्याचा नवरा व मुलगे व अविवाहित मुली, सदस्याचे अथवा तिच्या पतीचे तिच्यावर अवलंबून असलेले आईबाप व तिच्या मरण पावलेल्या मुलाची विधवा बायको व मुले यांचा समावेश होतो:

मात्र असे की जर कोणत्याही स्त्री सदस्याने मंडळास लेखी नोटीस पाठवून आपल्या कुटुंबातून आपल्या नवऱ्यास वगळण्याची इच्छा व्यक्त केल्यास व नंतर त्या सदस्याने मंडळास लेखी कळवून अशी कोणतीही नोटीस रद्द केली नसेल तर, या विनियमांच्या कारणासाठी अशा स्त्री सदस्याचा नवरा, या नवऱ्यापासून झालेली पण तिची सावत्र मुले, तिच्या सावत्र मुलांची विधवा बायको अथवा मुले व तिच्या नवऱ्याचे अवलंबून असलेले आईवडील या व्यक्ती सदरहू सदस्याच्या कुटुंबातील व्यक्ती म्हणून त्यापुढे समजल्या जाणार नाहीत.

खुलासा - प्रस्तुत खंडात निर्दिष्ट केलेल्या दोन बाबींपैकी प्रत्येक बाबतीत एखाद्या सदस्याचे मूल दुसऱ्या व्यक्तीने दत्तक म्हणून घेतले असेल आणि अशा दत्तक घेणाऱ्या व्यक्तीस लागू असलेल्या व्यक्तीविधीअन्वये या दत्तविधानास कायदेशीर मान्यता मिळालेली असेल तर असे मूल अशा सदस्याच्या कुटुंबातून वगळण्यात आले आहे असे समजले जाईल. त्याचप्रमाणे सदस्याने दत्तक घेतलेले मूल हे, उपरोक्त शर्ती पूर्ण होत असतील तर त्या सदस्याच्या कुटुंबात समाविष्ट आहे असे समजण्यात येईल;



(के) 'वित्तीय वर्ष' या संज्ञेचा अर्थ, एप्रिल महिन्याच्या पहिल्या दिवसापासून सुरु होणारे वर्ष असा होय;

(ल) 'निधी' या संज्ञेचा अर्थ, या विनियमांन्वये स्थापन करण्यात आलेला भविष्यनिर्वाह निधी असा होय;

(म) 'रजा' या संज्ञेचा अर्थ, महामंडळाने मान्य केलेली कोणत्याही प्रकारची रजा असा होय;

(न) सदस्य या संज्ञेचा अर्थ निधीचा सदस्य होण्यास पात्र असलेला असा महामंडळाचा जो कर्मचारी निधीचा सदस्य झालेला आहे व ज्याचा महामंडळातील सेवाकाळ संपून त्या तारखेपासून त्याचे निधीतील सदस्यत्व चालू ठेवण्यांत अपात्र झालेला आहे असा कर्मचारी होय.

(ओ) 'मंडळाचा अध्यक्ष' या संज्ञेचा अर्थ, निधीच्या विश्वस्त मंडळाचा अध्यक्ष असा होय;

(प) 'चिटणीस' या संज्ञेचा अर्थ, विनियम ४ (२) अन्वये नेमण्यात आलेला अधिकारी अस होय;

(क्यू) 'कलम' या संज्ञेचा अर्थ, अधिनियमाचे कलम असा समजावा;

(र) 'वर्गणी' या संज्ञेचा अर्थ, विनियम १४ (१) (२) अन्वये सदस्याच्या प्राप्तीमधून वजा करण्यात आलेली आणि/अथवा सदस्याने विनियम १४ (१) (३) अन्वये भरलेली रक्कम असा होय; व

(स) 'विश्वस्त' या संज्ञेचा अर्थ, विश्वस्त मंडळाचा सदस्य असा होय व त्यात मंडळाच्या अध्यक्षाचा समावेश होईल.

३. निधी -१) या विनियमांन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी नावाचा एक निधी स्थापन करण्यात येईल व तो एका विश्वस्तलेखा अन्वये विश्वस्त मंडळाकडे निहित करण्यातयेईल व हा विश्वस्तलेखा निधीचा फायदा घेणाऱ्या सर्व सदस्यांनी मान्य केल्याखेरीज रद्द करता येणार नाही.

(२) या निधीत, सदस्यांनी दिलेल्या वर्गण्या, अंशदाने, अशा वर्गण्यांच्या व अंशदानांच्या पोटी गोळा झालेल्या रकमा, अशा वर्गण्या, अंशदाने व गोळा झालेल्या रकमांवर जमा झालेले व्याज आणि निधीच्या मत्तेपासून मिळणारा कोणताही भांडवली नफा यांचा समावेश होईल.

४. विश्वस्त मंडळाची प्रस्थापना- (१) महामंडळाकडून पुढील व्यक्तींचा समावेश असलेल्या विश्वस्त मंडळामार्फत निधीचा कारभार पाहिला जाईल:-

(अ) महामंडळाकडून महाराष्ट्र शासनाच्या मंजुरीने नामनिर्देशित केला जाईल असा मंडळाचा अध्यक्ष;

(ब) महामंडळाकडून वेळोवेळी नेमण्यात येतील असे महामंडळाचे दोन प्रतिनिधी; आणि

(क) मंडळाच्या अध्यक्षांकडून निधीच्या सदस्यांमधून नेमण्यात येतील असे कर्मचाऱ्यांचे दोन प्रतिनिधी.

(२) महामंडळ सदरहू मंडळाच्या चिटणीस म्हणून काम पाहण्यासाठी महामंडळाच्या एका अधिकाऱ्याची नेमणूक करील व त्यास महामंडळ वेळोवेळी ठरवून देईल अशा कर्मचारीवर्गाची मदत मिळेल आणि सभा बोलाविणे, सभेच्या कामकाजाच्या नोंदणी ठेवणे, योग्य रीतीने हिशोब ठेवले जात आहेत याची खात्री करुन घेणे व मंडळाने घेतलेले निर्णय पार पाडणे हे या चिटणीसाचे कर्तव्य असेल.

(३) कोणत्याही विश्वस्तांच्या मृत्यूमुळे अथवा त्याने राजीनामा दिल्यामुळे अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे प्रसंगोपात्त रिकाम्या होणाऱ्या जागा भरण्याचा महामंडळास अधिकार असेल.

५. पदावधी.–(१) प्रत्येक विश्वस्ताचा पदावधी तीन वर्षाचा असेल व तो त्याच्या नेमणुकीच्या तारखेपासून सुरू होईल व त्यानंतर त्याचा उत्तराधिकारी त्या पदावर रुजू होईपर्यंत चालू राहील.

(२) प्रसंगोपात्त रिकामी होणारी जागा भरण्यासाठी नामनिर्देशित करण्यात आलेला कोणताही विश्वस्त हा, विनियम ४, पोट-विनियम (१) अन्वये त्या जागी नवीन विश्वस्त नेमण्यात येईतोपर्यंत पद धारण करील.

(३) मावळता विश्वस्त हा पुन्हा नामनिर्देशित केला जाण्यास पात्र राहील.

६. विश्वस्ताच्या पदासाठी अनर्हता.– पुढे दिलेल्या कारणासाठी एखादा इसम विश्वस्त म्हणून नेमला जाण्यास अनर्ह ठरविला जाईल:-

(१) एखाद्या सक्षम न्यायालयाने तो विकल मनाचा असल्याचे जाहीर केले असेल, अथवा

(२) तो अमुक्त नादार असेल; अथवा

(३) नैतिक अधोगतीच्या स्वरुपाच्या एखाद्या अपराधाबद्दल त्यास दोषी ठरविण्यात आले असेल.

७. विश्वस्ताने आपल्या पदाचा राजीनामा देणे अथवा पदावर असण्याचे थांबविणे– (१) एखाद्या विश्वस्तास महामंडळाच्या नावे पत्र पाठवून आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि महामंडळ त्याचा राजीनामा ज्या तारखेस स्वीकृत करील त्या तारखेपासून त्याचे पद रिकामे होईल:

मात्र असे की मंडळाच्या अध्यक्षांचा राजीनामा हा, त्यास महाराष्ट्र शासनाची मान्यता मिळवून स्वीकृत केला जाईतोपर्यंत अंमलात येणार नाही.

(२) पुढील कारणांसाठी एखादा विश्वस्त हा विश्वस्त म्हणून राहणार नाही:-



(१) वरील विनियम ४(१) (क) अन्वये नेमण्यात आलेला विश्वस्त म्हणून असताना त्याने नधीचा सदस्य म्हणून असण्याचे थांबविले, अथवा

(२) वरील विनियम ६ अन्वये त्यास अनर्ह म्हणून ठरविण्यात आले, अथवा

(३) मंडळाकडून गैरहजर राहण्याची परवानगी न मिळविता तो मंडळाच्या लागोपाठच्या तीन सभांना अनुपस्थित राहिला:

मात्र असे की, जर मंडळाने स्वतः प्रस्ताव करुन अथवा अशा विश्वस्ताने या बाबतीत अर्ज केल्यास कोणत्याही कारणास्तव अशा अनुपस्थितीबद्दल माफी केली तर तो विश्वस्त, विश्वस्त म्हणून आपल्या पदी कायम राहील.

८. मंडळाच्या सभा.– (१) मंडळाचे अध्यक्ष ठरवून देतील अशा जागी व अशा वेळी विश्वस्त मंडळाची सभा घेतली जाईल, मंडळाच्या अध्यक्षास, त्यास योग्य वाटेल तेव्हा मंडळाची सभा बोलाविता येईल आणि त्याने तीनपेक्षा कमी नाही इतक्या विश्वस्तांकडून सभा बोलाविण्यासाठी केलेली लेखी मागणी त्यास मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत अशी सभा बोलाविली पाहिजे.

(२) सर्व विश्वस्तांना प्रत्येक सभेची निदान पूर्ण दहा दिवसांची नोटीस देण्यात आली पाहिजे आणि अशा नोटिशीत सभेची तारीख, वेळ व जागा व सभेत पार पाडावयाच्या कामकाजाची यादी देण्यात आली पाहिजे:

मात्र असे की, जेव्हा मंडळाचा अध्यक्ष हा, त्याच्या मते जी तातडीची असेल अशा कोणत्याही बाबीचा विचार करण्यासाठी सभा बोलावील तेव्हा मंडळाच्या अध्यक्षाने दिलेली व त्याच्या मते वाजवी असलेली अशी कोणतीही अल्प मुदतीची नोटीस या विनियमाच्या कारणासाठी पुरेशी म्हणून समजण्यात येईल.

(३) मंडळाचा अध्यक्ष हा, मंडळाच्या प्रत्येक सभेचा अध्यक्ष म्हणून काम पाहील. तो गैरहजर असल्यास विश्वस्त हे आपल्यातील एका सदस्याची सभेचा अध्यक्ष म्हणून निवड करतील.

९. गणपूर्ती आणि मंडळाच्या सभेच्या वेळी अनुसरावयाची कार्यपद्धती.– (१) मंडळाच्या कोणत्याही सभेत निदान तीन विश्वस्त हजर असल्याशिवाय तीत कोणतेही कामकाज पार पाडता कामा नये, या तीन विश्वस्तांत विनियम ४, पोट-विनियम (१) च्या खंड (ब) अन्वये नामनिर्देशित केलेला एक विश्वस्त व वनियम ४, पोट-विनियम (१) च्या खंड (क) अन्वये नामनिर्देशित केलेला एक विश्वस्त असणे आवश्यक आहे.

(२) जर कोणत्याही सभेस हजर असलेल्या विश्वस्तांची संख्या ही आवश्यक त्या गणपूर्तीपेक्षा कमी असेल तर मंडळाच्या अध्यक्षाने प्रस्तुत सभा स्थगित केली पाहिजे व विश्वस्तांना अशा स्थगित केलेल्या सभेची वेळ व जागा कळविली पाहिजे आणि असे केल्यावर नंतरच्या सभेत हजर असलेल्या विश्वस्तांची संख्या कितीही असली तरी आणि

विनियम ४, पोट-विनयम (१) च्या खंड (ब) अथवा खंड (क) अन्वये नामनिर्देशित केलेला कोणताही विश्वस्त हजर असो अथवा नसो अशा स्थगित केलेल्या सभेत कामकाज पार पाडणे विधिसंमत ठरेल.

(३) मंडळाच्या सभेत विचार केल्या जाणाऱ्या प्रत्येक प्रश्नावर सभेस हजर असलेल्या विश्वस्तांच्या बहुमताने व मतदान घेऊन निर्णय घेतला जाईल, आणि मतांची समान विभागणी होईल अशा प्रसंगी मंडळाच्या अध्यक्षास दुसरे अथवा निर्णायक मत राहील.

(४) मंडळाचे कोणतेही कृत्य अथवा कोणतीही कार्यवाही, कोणतेही पद रिकामे आहे अथवा मंडळाच्या प्रस्थापनेत कोणताही दोष आहे अथवा मंडळाच्या अध्यक्षाच्या अथवा कोणत्याही विश्वस्ताच्या नेमणुकीत कोणताही दोष आहे याच केवळ कारणास्तव विधिबाह्य म्हणून समजण्यात येणार नाही.

**१०. सभेचे कार्यवृत्त.-** मंडळाच्या सभेच्या कार्यवृत्तात इतर गोष्टींबरोबर सभेत हजर असलेल्या विश्वस्तांची नावे देखील नमूद केलेली असतील. हे कार्यवृत्त सर्व विश्वस्तांना सभेच्या तरखेपासून दहा दिवसांपेक्षा उशिरा नाही असे पाठविण्यात येईल. त्यानंतर या सभेच्या कार्यवृत्ताची कार्यवृत्त पुस्तकात नोंद करण्यात येईल. अशा रीतीने नोंद केलेले कार्यवृत्त कायम करण्यात आल्यावर अध्यक्षाने पुढील सभेत त्यावर सही केली पाहिजे.

**११. निधीच्या प्रशासनाचा खर्च–** (१) निधीची व्यवस्था पाहण्यासाठी महामंडळाकडून नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते धरून निधीच्या प्रशासनासंबंधीचा सर्व खर्च महामंडळाने केला पाहिजे व त्याचा भार निधीवर टाकता कामा नये.

(२) महामंडळाच्या कर्मचारी किंवा सदस्य असलेल्या विश्वस्ताच्या प्रवासभत्यास, यथास्थिति अधिकृत कामकाज पार पाडण्यासाठी किंवा महामंडळाच्या सभेत हजर राहण्यासाठी केलेल्या प्रवासाबद्दलच्या भत्यांसंबंधीचे महामंडळाचे नियम लागू होतील. इतर विश्वस्तांना मात्र मंडळाच्या प्रत्येक सभेबद्दल त्यांच्या नेहमीच्या कमाच्या ठिकाणापासून परत त्या ठिकाणापर्यंत किंवा ज्या ठिकाणांच्यामध्ये प्रत्यक्ष प्रवास केला असेल त्या प्रत्येक ठिकाणापासून परत त्या अंतराकरिता महराष्ट्र शासनाच्या सेवेत असलेल्या प्रथम श्रेणीच्या अधिकाऱ्यांना मिळू शकेल अशा प्रवासभत्याच्या दरांनी प्रवासभत्ता मिळेल.

स्पष्टीकरण- जर एखाद्या विश्वस्ताने नोकर म्हणून त्याच्या मालकाकडून त्याच दिवसाबद्दल किंवा त्याच प्रवासाबद्दल किंवा त्याच कोणत्याही विधानमंडळाचा किंवा शासनाने स्थापन केलेल्या कोणत्याही संस्थेचा सदस्य म्हणून असा भत्ता घेतला असेल किंवा घेण्याचा त्याचा इरादा असेल तर त्यास प्रस्तुत विनियमान्वये कोणत्याही प्रवासभत्याची मागणी करता येणार नाही आणि जर त्याने शासनाच्या, महामंडळाच्या किंवा त्याच्या मालकांच्या खर्चाने पुरविलेल्या कोणत्याही वाहनाचा वापर केला असेल तर सभेच्या दिवसाबद्दलच्या दैनिक भत्याव्यतिरिक्त इतर कोणताही प्रवासभत्ता मिळण्यास तो पात्र असणार नाही.



**१२. निधीचे सदस्य.–** प्रत्येक कर्मचाऱ्याने, ज्या तारखेस त्याची महामंडळात सतत एक वर्षाची नोकरी पूर्ण होईल त्या तारखेपासून हे विनियम ज्या तारखेस अंमलात येतील त्या तारखेपासून यांपैकी जी नंतर येत असेल त्या तारखेपासून निधीचा सदस्य झाले पाहिजे:

मात्र असे की, या विनियमांपैकी विनियम २ चे कलम (ह) यात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या महामंडळाच्या कोणत्याही सेवा नियमात किंवा विनियमात काहीही असले तरी महामंडळास आपल्या मर्जीनुसार सेवेच्या विशेष कराराने कामावर लावलेल्या कोणत्याही कर्मचाऱ्यास प्रत्येक व्यक्तिगत बाबतीत महामंडळ ठरवील अशा शर्तींवर निधीचा सदस्य होण्याची परवानगी देण्याचा अधिकार असेल;

[आणखी असे की प्रतिनियुक्तीवर असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास महामंडळातील त्याची सेवा जमेस धरण्यास व महामंडळाच्या सेवेत तो सामावून घेतला गेला असेल त्या तारखेपासूनच त्याजकडून वर्गणी वसूल करण्याबाबत अनुमती देण्याचा मंडळास अधिकार असेल]*.

**१३. वर्गणीदारांनी करावयाची कबुलायत.–**निधीचा सदस्य होण्यापूर्वी प्रत्येक सदस्याने नमुना १ मध्ये कबुलायत करुन दिली पाहिजे.

**१४. वर्गणीचे व अंशदानाचे दर -** (१) (१) प्रत्येक सदस्याने दरमहा निधीत द्यावयाच्या वर्गणीचा दर त्याने त्या महिन्यात अर्जित केलेल्या एकूण वेतनाच्या शेकडा बारा टक्के इतका असेल. (२२-९-९७ पासून)

(२) महामंडळाने दि. १९-५-९४ रोजी झालेल्या २२८व्या सभेतील ठराव क्र.३०२० अन्वये अंशदानात्मक भनि निधींची सुविधा रोजंदारीवरील कर्मच्यारांनासद्धा उपलब्ध करून देण्यांत आलेली आहे.

(३) सदस्याने द्यावयाची वर्गणी महामंडळ वेतन-बटवडयाच्या वेळी प्रत्येक सदस्याच्या वेतनातून वसूल करील.

(४) एखाद्या सदस्याने आपले वेतन इतरत्र मिळविले असेल अशा बाबतीत त्या सदस्याने प्रत्येक महिन्यास आपली वर्गणी चिटणीसाकडे दिली पाहिजे. चिटणीस ती सदस्याच्या खाती जमा करील.

(५) कोणत्याही सदस्यास आपल्या वर्गणीचा दर कोणत्याही वेळी वाढविण्याचा अधिकार आहे. मात्र असे की, वर्गणीचा दर त्याच्या वेतनाच्या २० टक्क्यांपेक्षा अधिक होता कामा नये. म्हणजेच ऐच्छिक वर्गणीचा दर ८ टक्के इतका राहिल. आणखी असे की नियोजित वाढीची पूर्वसूचना अध्यक्ष वेळोवेळी ठरवील अशा तारखांस चिटणीसला दिली पाहिजे. सदर दराची मर्यादा वाढविण्यात महामंडळाने दि. १६.१२.१९९७ रोजी झालेल्या २४७ व्या सभेतील ठराव क्र. ३२८६ अन्वये दिलेली आहे.

---

[ ]* ठराव क्र. ९ [ ]† ठराव क्र. ११ [ ]* ठराव क्र. १७

(६) द्यावयाच्या वर्गणीची रक्कम पूर्ण रुपयांच्या पूर्ण रकमेत असली पाहिजे. ५० पैसे किंवा त्याहून अधिक पैशांबद्दल एक रुपया धरला जाईल व पन्नास पैशांहून कमी असलेली रक्कम हिशेबात घेतली जाणार नाही.

(२) महामंडळ, प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेस किंवा त्यापूर्वी मालकाचे अंशदान म्हणून प्रत्येक कर्मचाऱ्याने भरलेल्या वर्गणीइतकी रक्कम [ विनियम १४ (१) (२) अन्वये सदस्यांकडून वसूल केलेल्या वर्गणीसह ] निधीत जमा करील. ही रक्कम पूर्ण रुपयांत असेल, परंतु कोणत्याही कर्मचाऱ्याच्या बाबतीत ती त्याच्या मागील महिन्यात मिळालेल्या एकूण वेतनाच्या १ पेक्षा अधिक होता कामा नये.

[टीप. – पुन्हा कामावर नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्तांच्या बाबतीत, त्याच्या सेवेस एक वर्ष पूर्ण झाल्यानंतरच महामंडळाचे अंशदान व्याजासह जमा करण्यात येईल आणि अशा नोकरीची मुदत एक वर्षाहून अधिक होत असेल तर पुन्हा कामावर नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्तांना अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीत ज्या मुदतीसाठी अंशदान करण्यास अनुमती देण्यात आली असेल त्या सर्व मुदतीसाठी, महामंडळाची अंशदानाची सव्याज रक्कम देय होईल.]

१५. निधीचे प्रशासन, लेखा व लेखापरीक्षा – (१) 'प्रशासन लेखा' नावाचे एक खाते ठेवण्यात येईल व निधीचा सर्व प्रशासकीय खर्च त्यात दखल करण्यात येईल.

(२) मालकाचे अंशदान म्हणून भरावयाची किमान रक्कम व कर्मचा-याने वर्गणी म्हणून भरलेली रक्कम अनुक्रमे 'मालकाचे अंशदान खाते' व 'कर्मचा-याच वर्गणी खाते' यांत जमा करण्यात येईल. कर्मचा-याने त्याच्या एकूण वेतनाच्या १२% पेक्षा अधिक भरलेली रक्कम वेगळ्या खात्यात जमा केली जाईल व त्या खात्यास 'कर्मचा-याचे स्वेच्छा वर्गणी खाते' असे संबोधण्यात येईल.

(३) विनियम १६ नुसार वर्गणीदारांच्या शिल्लक रकमेवर मिळणा-या व्याजाचा हिशोब, मालकाचे अंशदान, कर्मचा-याची वर्गणी व कर्मचा-याची स्वेच्छा वर्गणी याप्रमाणे विभागशः स्वतंत्रपणे केला पाहिजे व व्याजाच्या रकमा अनुक्रमे 'मालकाच्या अंशदानावरील व्याजाचे खाते', 'कर्मचा-याच्या वर्गणीवरील व्याजाचे खाते' व 'कर्मचा-याच्या स्वेच्छा वर्गणीवरील व्याजाचे खाते ' या नावाने संबोधण्यात येणा-या खात्यांत जमा करण्यात येतील.

(४) कर्मचा-याचे निधीचे सदस्यत्व संपुष्टात आल्याबरोबर त्याच्या खात्यावर जमा असलेली, मालकाचे अंशदान, कर्मचा-याची किमान वर्गणी, कर्मचा-याची स्वेच्छा वर्गणी, मालकच्या अंशदानावरील व्याज, कर्मचा-याच्या किमान वर्गणीवरील व्याज आणि कर्मचा-याच्या स्वेच्छा वर्गणीवरील व्याज यांची मिळून बनलेली शिल्लक रक्कम 'सेवानिवृत्त सदस्याचे खाते' या नावाने संबोधण्यात येणा-या खात्यात स्थानांतरित करण्यात येईल. ज्याचे सदस्यत्व संपुष्टात आले असेल अशा कोणत्याही कर्मचा-यास त्यानंतर द्यावयाच्या कोणत्याही रकमा 'सेवनिवृत्त सदस्याचे खाते' यात त्याच्या नावे जमा असलेल्या पैशांतून दिल्या जातील.



(५) विनियम २३, पोट-विनियम (२) यात तरतूद केल्याप्रमाणे असेल ते खेरीज करुन विनियम २१ व २३ अन्वये निधीत जप्त केलेल्या सर्व रकमा 'राखीव खाते' या नावाने संबोधण्यात येणा-या खात्यात स्थानांतरित करण्यात येतील.

(६) निधीच्या सर्व रक्कमा त्या मिळाल्याच्या दिनांका पासून कामाच्या तीन दिवसांच्या आंत रिझर्व बॅकेतील किंवा स्टेट बॅक ऑफ इंडिया किंवा इतर कोणत्याही अनुसूचीत बॅकेतील निधीच्या खाती जमा केल्या जातील व जोपर्यंत त्या रक्कमा महाराष्ट्र सरकारच्या तारण पत्रांत आणि महाराष्ट्र शासनाने संपूर्णपणे व बिनशर्त हमी दिलेल्या तारण पत्रांत किंवा पोस्ट ऑफिसच्या १ वर्षीय, ३ वर्षीय किंवा ५ वर्षीय अनामत योजनेत गुंतवणूक करत नाही तोपर्यंत त्या बॅकेच्या चालू खाते किंवा मुदतीच्या ठेवीमध्ये ठेवल्या जातील.
(विश्वस्त मंडळाची सभा क्र. ५ दि. ६.४.७१ चा ठराव क्र. ३३. )

(७) निधीवर यथास्थिती मिळालेले सर्व व्याज किंवा इतर कोणतेही उत्पन्न 'व्याज उत्पन्न खाते' या नावाने संबोधण्यात येणा-या खात्यात जमा करण्यात येईल.

(८) प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत मंडळ अशा वित्तीय वर्षाचा ताळेबंद व उत्पन्न व खर्चाचे विवरणपत्र तयार करील किंवा करवील. ताळेबंदावर अध्यक्षाने किंवा कोणत्याही दोन विश्वस्तांनी सही केली पाहिजे.

विनियम २५ अन्वये सादर करावयाच्या वार्षिक अहवालात ताळेबंद आणि उत्पन्न व खर्चाचे विवरणपत्र हया दोन गोष्टी समाविष्ट करण्यात येतील.

(९) निधीचे हिशेब महामंडळाचे हिशेब तपासणीच्या संबंधीत असल्यामुळे या संबधीत अधिका-याना निधीचे तयार केलेले हिशेब व त्यासंबधीची देयके वा इतर कागदपत्रे मागण्यांचे व तपासण्याचे समान व विशेष हक्क आणि अधिकार राहातील.
(विश्वस्त मंडळाची सभा क्र. ४ दि. ११.११.७० चा ठराव क्र. २७)

(१०) हिशोबाची सर्व पुस्तके महामंडळाच्या मुख्यालयात किंवा मंडळ आदेश देईल अशा इतर ठिकाणी ठेवण्यात येतील.

१६. प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस किंवा त्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर मंडळ–

(अ) तारणपत्रांवरील व्याज म्हणून किंवा अन्यथा मिळालेल्या किंवा चालू वर्षात निधीच्या गुंतविलेल्या रकमांवर व निधीच्या इतर मत्तांवर मिळालेल्या एकूण उत्पन्नाचा हिशोब तयार करील;

(ब) निधीच्या प्रत्येक सदस्याच्या खाती जमा असलेल्या सर्व ठेवींवर, मिळालेल्या उत्पन्नाची वाजवी दखल घेऊन व महामंडळाच्या संमतीने अशा वित्तीय वर्षात मिळू शकेल असा व्याजाचा दर ठरवील व जाहीर करील; आणि

(क) सदरहू वित्तीय वर्षासाठी व वित्तीय वर्षात सदस्यास मिळणारी व्याजाची रक्कम पुढे दिलेल्या रीतीने जमा करील:-

(१) अशा वित्तीय वर्षाच्या सुरवातीस म्हणजेच एप्रिल महिन्याच्या १ल्या तारखेस सदस्याच्या खाती जमा असलेल्या रकमेतून अशा वर्षात काढलेल्या कोणत्याही रकम वजा करुन बाकी रकमेवर बारा महिन्यांचे व्याज;

(२) अशा वित्तीय वर्षात काढलेल्या रकमांवर चालू वर्षाच्या एप्रिल महिन्याच्या १ल्या तारखेपासून रक्कम काढल्याच्या महिन्याच्या अगोदरच्या महिन्याच्या शेवटच्या दिवसांपर्यंतचे व्याज;

(३) अशा वित्तीय वर्षात वर्गणीदाराच्या खाती जमा म्हणून दाखल झालेल्या सर्व रकमांवर रक्कम ठेवल्याच्या तारखेपासून चालू वर्षाच्या मार्च महिन्याच्या ३१ तारखेपर्यंतचे व्याज;

(४) व्याजाची एकूण रक्कम विनियम १४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने शेवटच्या पूर्ण रुपयांत काढली जाईल;

मात्र असे की, वर्षाचे हिशोब बंद करण्यात येण्यापुर्वी ज्यांचे सदस्यत्व संपुष्टात आलले असेल अशा कर्मचाऱ्याच्या बाबतीत मागील वित्तीय वर्षासाठी ठरविलेल्या दराने संदस्यत्व संपुष्टात आल्याच्या तारखेपर्यंतचे व्याज आकारले जाईल.

(५) निधीचे सभासत्व संपलेल्या व्यक्तीच्या एकूण जमा रक्कमेवर तरतूद केलेला व्याजाचा दराने.... व्याज, त्याचे सभासत्व संपलेल्या तारखेपासून जास्तीत जास्त सहा महिन्यापर्यंत, संपलेल्या आर्थिक वर्षातील व्याजाच्या दराने व्याज आकारणी करण्यांत मान्यता राहील.

१७. सदस्याचे खाते– (१) निधीच्या प्रत्येक सदस्याकरिता नमुना २ मध्ये वैयक्तिक खाते ठेवण्यात येईल.

(२) वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत प्रत्येक सदस्यास नमुना ३ मध्ये हिशोबाच्या विवरणपत्राच्या दोन प्रती पुरविण्यात येतील. त्यांत त्याच्या खाती जमा असलेली वर्गणीची व अंशदानाची (त्यावरील व्याज धरुन) सुरुवातीची शिल्लक, वित्तीय वर्षात जमा झालेल्या वर्गणीच्या व अंशदानाच्या रकमा, त्या वर्षासाठी त्याच्या खाती जमा झालेले एकूण व्याज, त्या वर्षात त्याने काढलेल्या रकमा आणि त्या वर्षाअखेर त्याच्या खाती जमा झालेली वर्गणीची व अंशदानाची व्याजासह एकूण रक्कम ह्या बाबी दर्शविण्यात येतील.

(३) प्रत्येक सदस्य अशा हिशोबाच्या विवरणपत्राची दुसरी प्रत, तीत केलेल्या नोंदीच्या बिनचूकपणाविषयी स्वतःची खात्री केल्यानंतर त्याबाबतच्या मान्यते दाखल तीवर योग्य रीतीने सही करुन ती मिळाल्याच्या तारखेपासून दोन महिन्यांपेक्षा उशिरा नाही अशा मुदतीत चिटणीसास परत करील. तसे त्याने न केल्यास हिशोब बरोबर आहे असे समजण्यात येईल.

(४) कोणत्याही सदस्याने तशी विनंती केल्यास ज्या महिन्यासाठी सदस्याचा हिशोब लिहून पूर्ण झाला असेल त्या महिन्याच्या लगत मागील महिन्याच्या अखेरीस त्या सदस्याच्या नावे जमा असलेल्या एकूण रकमेचे विवरणपत्र चिटणीस त्यास देतील; मात्र असे विवरणपत्र सहा महिन्यांतून फक्त एकदाच दिले जाईल.

१९. निधीतून आगाऊ रक्कम देणे.– (१) सदस्याच्या नावे निधीत जमा असलेल्या



१८. (१) (एक) निधीत सामील झाल्यापासून शक्य होईल तितक्या लवकर प्रत्येक सदस्य त्याच्या नावे जमा असलेली रक्कम त्याला देण्यापूर्वी तो मरण पावल्यास ती रक्कम एका किंवा त्याहून अधिक इसमास मिळण्याचा हक्क प्रदान करणारे एक नामनिर्देशनपत्र लिहून देईल; मात्र असे की, जर नामनिर्देशनपत्र करण्याच्या वेळी त्या सदस्याचे कुटुंब असेल तर असे नामनिर्देशनपत्र त्याच्या कुटुंबातील सदस्यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही इसमाच्या किंवा इसमांच्या नावे असता कामा नये.

(दोन) कुटुंब नसणाऱ्या इसमाचे नामनिर्देशनपत्र तो नंतर कुटुंबवत्सल झाल्यास ताबडतोब रद्दबातल होईल. असा सदस्य कुटुंबवत्सल झाल्यानंतर वरील खंड (१) अन्वये नवीन नामनिर्देशनपत्र करुन देईल.

(२) एखाद्या सदस्याने पोट-विनियम (१) अन्वये एकापेक्षा अधिक इसमांस नामनिर्दिष्ट केले असेल तर तो, कोणत्याही वेळी निधीत त्याच्या नावे जमा असलेली सर्व रक्कम अंतर्भूत होईल अशा रीतीने नामनिर्दिष्ट केलेल्य प्रत्येक इसमास द्यावयाच्या हिश्श्याची रक्कम नामनिर्देशनपत्रात नमूद करील.

(३) लेखी नोटीस देऊन असे नमनिर्देशनपत्र कोणत्याही वेळी रद्द करण्याचा किंवा त्यात फेरफार करण्याचा सदस्यास अधिकार आहे; मात्र असे की, सदस्य ह्या विनियमाच्या उपबंधानुसार केलेले नवीन नामनिर्देशनपत्र सदरहू नोटिशीबरोबर पाठवील.

(४) कोणत्याही सदस्यास नामनिर्देशपत्रात पुढील तरतूद करता येईल:-

(अ) नामनिर्दिष्ट केलेला कोणताही विशिष्ट इसम सदस्याच्या आधी मरण पावल्यास, त्या नामनिर्दिष्ट केलेल्या इसमास प्रदान केलेला हक्क नामनिर्देशनपत्रात नमूद करण्यात येईल अशा इतर इसमाकडे किंवा इसमांकडे जाईल.

(ब) नामनिर्देशनपत्रात नमूद केलेली कोणतीही आकस्मिक घटना घडल्यास ते रद्दबातल होईल.

(५) ज्याच्या संबंधात पोट-विनियम (४) चा खंड (अ) अन्वये कोणतीही खास तरतूद करण्यात आलेली नसेल असा नामनिर्दिष्ट केलेला इसम मरण पावल्यास किंवा ज्यायोगे पोट-विनियम (४) चा खंड (ब) नुसार नामनिर्देशनपत्र रद्दबातल होते अशी कोणतीही घटना घडल्यास त्यानंतर लगेच सदस्य नामनिर्देशनपत्र रद्द केल्याची व ह्या विनियमाच्या उपबंधानुसार नवीन नामनिर्देशनपत्र केल्याची लेखी नोटीस चिटणीसास पाठवील.

(६) प्रत्येक नामनिर्देशनपत्र, प्रत्येक बाबीच्या संबंधात योग्य असेल त्याप्रमाणे ह्या विनियमांस जोडलेले नमुने ४,५ व ६ यांपैकी कोणत्याही एका नमुन्याबरहुकूम असेल.

(७) सदस्याने केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र व दिलेली प्रत्येक सूचना ही चिटणीसास कळविण्यात आली पाहिजेत व ती चिटणीसास ज्या तारखेस मिळतील त्या तारखेपासून अंमलात येतील.

१८. निधीतून आगाऊ रक्कम - देणे — सदस्याच्या नावे
निधीत जमा असलेल्या)

रकमेतून पुढीलपैकी कोणत्याही कारणांसाठी त्यास आगाऊ रक्कम मंजूर करण्याचा अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास आहे:-

(१) सदस्याच्या किंवा त्याच्या कुटुंबातील इसमाच्या दीर्घकालीन गंभीर आजारपणाच्या संबंधात झालेला खर्च भागविण्यासाठी आणि सदस्याच्या किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही इसमाच्या प्रकृतीच्या कारणास्तव झालेला समुद्रपार प्रवासाचा खर्च भागविण्यासाठी.

(२) सदस्याच्या कुटुंबात विवाहाप्रित्यर्थ किंवा कोणत्याही इतर धार्मिक विधीप्रित्यर्थ सदस्याच्या दर्जास अनुरूप असा झालेला खर्च भागविण्यासाठी.

(३) सदस्याच्या किंवा त्याच्या कुटुंबातील इसमाच्या भारतातील किंवा भारताबाहेरील शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी (यात समुद्रपार प्रवास खर्चाचा समावेश होतो.)

(४) सदस्याच्या कार्यालयीन कोणत्याही अभिकथित गैरवर्तणुकीबद्दल त्याच्यावर न्यायालयात खटला भरला असेल तेव्हा त्याच्या बचावाचा खर्च भागविण्यासाठी.

(५) सदस्याने कार्यालयातील आपले कर्तव्य पार पाडताना केलेल्या किंवा केल्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृत्यांच्या संबंधात त्याच्यावर करण्यात आलेल्या कोणत्याही आरोपांच्या बाबतीत आपल्या बाजूचे प्रतिसमर्थन करण्याकरीता कोणत्याही समुचित प्राधिकाऱ्याने त्यास तसा निदेश दिला असेल तेव्हा, त्याने दाखल केलेल्या कोणत्याही वैध कार्यवाहीचा खर्च भागविण्यासाठी.

(६) चोरी झाल्यास किंवा लूटमार झाल्यास ताबडतोबीचे सहाय्य म्हणून.

(७) सदस्याच्या किंवा त्याच्या पत्नीच्या किंवा तिच्या पतीच्या किंवा सदस्याच्या मुलांच्या आयुर्विमापत्रांचे सहा महिन्यांत एका वेळेपेक्षा अधिक नाहीत असे हप्ते भरण्यासाठी, परंतु-

(अ) विमापत्राच्या तपशील मान्यतेसाठी मंडळाकडे सादर केला गेल्याशिवाय आणि विमापत्र मंडळाकडे अभिहस्तांकित केलेले असल्याशिवाय आणि विमा कंपनीने दिलेल्या पावत्या निरीक्षणासाठी वेळोवेळी मंडळाच्या स्वाधीन केलेल्या असल्याशिवाय अशी आगाऊ रक्कम संवितरित करता कामा नये; आणि

(ब) हप्त्याच्या प्रत्यक्ष रकमेपेक्षा अधिक अशी कोणतीही रक्कम संवितरीत करता कामा नये.

(८) असा ठराव करण्यांत येतो की, भ.नि निधी विषयक विनिमय - १९६८ च्या नियम क्र.१९ (१) पोटकलम ८ मध्ये खालील बाब अंतर्भूत करणे आवश्यक आहे. घर किंवा फ्लॅट खरेदी करताना येणाऱ्या प्राथमिक खर्चा करीता जास्तीत जास्त ५०००/- रूपयांपर्यंत अग्रीम मंजूरची मर्यादा राहील.

स्पष्टीकरण (१) या उपविनियमाच्या कारणासाठी 'कुटुंब' या संज्ञेत सदस्यावर संपूर्णतः



अवलंबून असलेली सावत्र मुले, अविवाहित व विधवा बहिणी आणि अज्ञान भाऊ यांचाही समावेश होतो.

स्पष्टीकरण (२) या उप-विनियमात उल्लेख केलेला 'सक्षम प्राधिकारी' म्हणजे अशा आगाऊ रकमा मंजूर करण्याकरिता महामंडळाने वेळोवेळी नेमलेला प्राधिकारी होय. (२) उप-विनियम (१) अन्वये मंजूर केलेली आगाऊ रक्कम–

(अ) सदस्याच्या नावे जमा असलेल्या वर्गणीच्या एकूण रकमेपेक्षा अधिक असता कामा नये, आणि

(ब) उप-विनियम (१), खंड (१) ते (४) यात उल्लेख केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी अगाऊ रक्कम पाहिजे असेल तेव्हा ती रक्कम, विशेष कारणांसाठी असेल ती बाब वगळून, कर्मचा-याच्या तीन महिन्यांच्या एकूण प्राप्तीच्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.

(३) हया विनियमाचा उप-विनियम (१), खंड (७) अन्वये आयुर्विम्याच्या विमापत्राचे हप्ते भरण्यासाठी आगाऊ रकमा दिल्या असतील तेव्हा त्यांची वसुली करण्याची आवश्यकता असणार नाही.

(४) [(अ) वरील उप-विनियम (३) खालील बाब सोडून, सदस्याने अशी आगाऊ रक्कम सक्षम प्राधिकारी ठरवील इतक्या हप्त्यांमध्ये फेडणे आवश्यक आहे. आगाऊ रकमेचे मुद्दल पूर्णपणे फेडण्यात आल्यानंतर, रक्कम काढल्यापासून मुद्दलाची संपूर्ण फेड होईपर्यंतच्या मुदतीतील प्रत्येक महिन्याचे किंवा महिन्याच्या खंडित भागाचे जे मुद्दल असेल त्यावर शेकडा १/५ या दराने त्यावरील व्याज सदस्याने दिले पाहिजे. अशा रीतीने अशा हप्त्यांची व्याजासह वसूल झालेली रक्कम निधीतील सदस्याच्या खाती जमा केली पाहिजे.]*

(ब) सक्षम प्राधिका-याने अशा रीतीने ठरवावयाच्या हप्त्यांची संख्या ही, अत्यंत अपवादात्मक बाबतीत व विशेष कारणांकरिता सक्षम प्राधिका-याने जास्त संख्येइतक्या हप्त्यांत फेड करण्याची परवानगी दिली नसेल तर, (खुद्द सदस्याच्या विकल्पाव्यतिरिक्त) बारा मासिक हप्त्यांपेक्षा कमी असता कामा नये आणि चोवीस मासिक हप्त्यांपेक्षा अधिक असता कामा नये आणि कोणात्याही बाबतीत संख्या छत्तीस हप्त्यांपेक्षा अधिक असता कामा नये

(क) व्याजाची रक्कम ही, शेवटचा हप्ता ज्या महिन्यात वसूल केला असेल त्या महिन्याच्या नंतरच्या एका किंवा अधिक महिन्यांमध्ये वसूल केली पाहिजे.

(५) महामंडळाने असे हप्ते कर्मचा-याच्या पगाराच्या रकमेतून कापून घेतले पाहिजेत व अशा रीतीने कापून घेतले ली रक्कम मंडळास दिली पाहीजे. आगाऊ रक्कम ज्या महिन्यात संवितरित केली असेल त्या महिन्याच्या लगतनंतरच्या महिन्याच्या वेतनातून अशा रीतीने हप्ते कापून घेण्यास प्रारंभ होईल.

---

[ ]* ठराव क्र. १८

हेच संख्या

(६) आधीची कोणतीही आगाऊ दिलेली रक्कम किंवा तिच्यावरील व्याज येणे बाकी असेल तर, विशेष कारणांसाठी असेल ते खेरीज करून, कोणतीही आगाऊ रक्कम मंजूर करता कामा नये.

(७) भविष्य निर्वाह निधीतून आगाऊ रकमा देऊन हप्ते भरण्याची व्यवस्था करण्यात आलेल्या आयुर्विमापत्रांच्या बाबतीत कर्मचारी निधीचा सदस्य असलेल्या मुदतीत कोणत्याही विमापत्राची मुदत पूर्ण होत असेल तर, निधीतून वेळोवेळी भरलेल्या विमा हप्त्यांची एकूण रक्कम आणि विनियम १६ मध्ये तरतूद केलेल्या दराने होणारे तिच्यावरील व्याज विमा कंपनीकडून मिळालेल्या विम्याच्या रकमेतून कापून घेण्यात आले पाहिजे आणि ती रक्कम सदस्याच्या खाती जमा करण्यात आली पाहिजे आणि कोणतेही रक्कम शिल्लक राहिल्यास, ती सदस्याच्या स्वाधीन करण्यात आली पाहिजे.

(८) वरील उप-विनियम (२), (४) व (६) यांत उल्लेख केलेली विशेष कारणे सक्षम प्राधिकाऱ्याने लेखी नमूद केली पाहिजेत. परंतु, ते कारण गोपनीय स्वरुपाचे असेल तर ते चिटणीसास जातीने कळविता येईल.

२०. निधीतून रक्कम अंतिमरीत्या काढून घेणे. — (१) या नियमाच्या उपबंधास अधीन राहून, सदस्याच्या सेवेची वीस वर्षे पूर्ण झाल्यानंतर किंवा नियत वयमानाप्रमाणेच्या त्याच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी दहा वर्षांच्या अवधीत कोणत्याही वेळी, यापैकी जी आधीची असेल त्या तारखेस, निधीत त्याच्या नावे जमा असलेल्या वर्गणीच्या रकमेतून पुढीलपैकी कोणत्याही एका किंवा अधिक कारणांसाठी रकमा अंतिमरीत्या काढून घेण्यास मंजुरी देण्याचा अधिकार विशेष आगाऊ रक्कम मंजूर करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकाऱ्यास आहे :-

(अ) सदस्यावर प्रत्यक्ष अवलंबून असलेल्या त्याच्या कोणत्याही मुलाचा पुढील बाबतीत उच्च शिक्षणाचा खर्च भागविण्यासाठी, (यात आवश्यक असेल तेव्हा प्रवास खर्चाचा समावेश होतो)—

(१) उच्च माध्यमिक शिक्षणानंतरच्या कोणत्याही अभ्यासक्रमाच्या भारताबाहेरील शिक्षणासाठी;

(२) उच्च माध्यमिक शिक्षणानंतरच्या भारतातील वैद्यकीय, अभियांत्रिकी किंवा इतर तांत्रिक किंवा विशेष अभ्यासक्रमासाठी;
मात्र असा अभ्यासक्रम तीन वर्षांपेक्षा कमी मुदतीचा असता कामा नये.

(ब) सदस्याच्या मुलाच्या किंवा मुलीच्या विवाहचा खर्च भागविण्यासाठी;

(क) सदस्याच्या किंवा त्याच्या कुटुंबातील कोणत्याही इसमाच्या कोणत्याही आजारपणावरील खर्च भागविण्यासाठी (यात आवश्यक असेल तेव्हा प्रवास खर्चाचा समावेश होतो)



(ड) (१) स्वतःला रहाण्यासाठी योग्य असे घर बांधण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी, (२) अशा घराकरिता जागा खरेदी करण्यासाठी, अथवा (३) सदस्याच्या आधीच्या मालकीच्या असलेल्या किंवा त्याने संपादन केलेल्या घराची पुनर्रचना करण्यासाठी किंवा त्यात वाढ करण्यासाठी किंवा त्यात फेरफार करण्यासाठी;

(इ) मालकी पद्धतीची किंवा भाडे-खरेदी पद्धतीची राहती जागा बांधण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी.

(२) काढून घ्यावयाची रक्कम चिटणीसाकडून प्राधिकरपत्र मिळाल्यावरच संवितरित केली पाहिजे. रीतसर मंजुरी देण्यात आल्यावर, शक्य तितक्या लवकर चिटणीसाने असे प्राधिकारपत्र देण्याची व्यवस्था करावी.

(३) रक्कम काढून घेणे पुढीलप्रमाणे अनुज्ञेय असेल:-

(अ) उप-विनियम (१), खंड (अ) खाली येणाऱ्या बाबतीत वित्तीय वर्षातून दोनदा; प्रथम रक्कम काढून घेणे व दुसऱ्यांदा रक्कम काढून घेणे यामधील कालावधी सहा महिन्यांपेक्षा कमी असता कामा नये;

(ब) उप-विनियम (१), खंड (ब) खाली येणाऱ्या बाबतीत, विवाह ज्या महिन्यात प्रत्यक्ष व्हावयाचा असेल त्या महिन्याच्या पूर्वी तीन महिन्यांपेक्षा आगाऊ नाही अशा कालावधीत रक्कम काढून घेणे अनुज्ञेय असेल.

(क) उप-विनियम (१), खंड (ड) व (इ) खाली येणाऱ्या बाबतीत, दोनाहून कमी नाहीत व चारापेक्षा अधिक नाहीत अशा समान हप्त्यांनी रक्कम काढून घेणे अनुज्ञेय असेल असा प्रत्येक हप्ता, बांधकामाची प्रगती पडताळून पाहिल्यावर स्वतंत्रपणे मंजूर करावयाचा आहे. परंतु घर खरेदी करण्यासाठी यात जागेच्या किंवा राहण्याच्या जागेच्या किंमतीचा समावेश होतो — काढून घ्यावयाची रक्कम, सदस्याच्या विनंतीनुसार एका हप्त्यात देता येईल;

(ड) उप-विनियम (१), खंड (क) खाली येणाऱ्या बाबतीत, रक्कम काढून घेणे वर्षातून एकदा अनुज्ञेय असेल.

(४) (अ) घरबांधणीचे काम रक्कम काढल्यापासून सहा महिन्यांच्या आत सुरु झाले पाहिजे आणि बांधकाम सुरुझाल्याच्या तारखेपासून ते एक वर्षाच्या कालावधीत पूर्ण केले पाहिजे. आयते बांधलेले घर खरेदी करण्यासाठी रक्कम काढून घेण्याच्या बाबतीत रक्कम काढून घेतल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत घराचे व जमिनीचे निर्विवाद स्वामित्व मिळविले पाहिजे.

(ब) उप-विनियम (१), खंड (ड) (२) अनुसार घरासाठी जागेची खरेदी यथास्थिति संपुर्ण रक्कम काढून घेतल्याच्या तारखेपासून किंवा पहिला हप्ता घेतल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत केली पाहिजे.

(५) निधीतून रक्कम काढून घेण्यावर पुढीलप्रमाणे नियंत्रण असेलः (अ) उप-विनियम (१), खंड (अ) व (क) याखाली येणाऱ्या बाबतीत, सदस्याचे तीन महिन्यांच्या वेतनाएवढी रक्कम अथवा सदस्याच्या नावे जमा असलेल्या वर्गणीच्या शिल्लक रकमेच्या निम्मी रक्कम - यापैकी जी कमी असेल त्या रकमेपर्यंत काढता येईल;

(ब) उप-विनियम (१), खंड (ब) खाली येणाऱ्या बाबतीत, मुलाच्या विवाहासाठी तीन महिन्यांच्या वेतनाएवढी रक्कम अथवा वर्गणीच्या शिल्लक रकमेच्या निम्मी रक्कम यापैकी जी कमी असेल त्या रकमेपर्यंत मर्यादित राहिल आणि मुलीच्या विवाहासाठी, सहा महिन्यांचे वेतन अथवा वर्गणीच्या शिल्लक रकमेच्या निम्मी रक्कम यापैकी जी कमी असेल त्या रकमेपर्यंत मर्यादित राहील;

(क) उप-विनियम (१) खंड (ड) (२) खाली येणाऱ्या बाबतीत वर्गणीच्या शिल्लक रकमेच्या एक-चतुर्थांश रक्कम अथवा जागेची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी कमी असेल त्या रकमेपर्यंत मर्यादित राहील; आणि

(ड) इतर सर्व बाबतीत, सदस्यांच्या नावे जमा असलेल्या वर्गणीच्या शिल्लक रकमेच्या निम्म्या रकमेपर्यंत मर्यादित राहील.

(६) (अ) सदस्याने त्याच्या नावे निधीत जमा असलेल्या वर्गणीच्या रकमेमधून ह्या विनियमात निर्दिष्ट केलेल्या एका किंवा अधिक कारणांसाठी कोणत्याही वेळी काढून घेतलेली कोणतीही रक्कम साधारणतः अशा रकमेच्या निम्म्यापेक्षा अधिक असता कामा नये तथापि, मंजुरी प्राधिकारी, (१) ज्या हेतूसाठी रक्कम काढून घेण्यात येत आहे तो हेतु, (२) सदस्याचा दर्जा, आणि (३) सदस्याच्या नावे निधीत जमा असलेली वर्गणीची रक्कम या गोष्टींकडे योग्य लक्ष पुरवून ह्या मर्यादेपेक्षा अधिक म्हणजे वर्गणीच्या शिल्लक रकमेच्या तीन-चतुर्थांश रकमेपर्यंत रक्कम काढून घेण्यास मंजुरी देऊ शकेल.

(ब) ह्या विनियमानुसार निधीतून रक्कम काढून घेण्यास ज्यास अनुमती देण्यात आली आहे त्या सदस्याने, जेव्हा उप-विनियम (१), खंड (ड) (१) अनुसार घर बांधण्याच्या प्रयोजनासाठी रक्कम काढून घेण्यात येणार असेल तेव्हा बांधकामाच्या वेळोवेळी झालेल्या प्रगतीसंबंधाने याबाबत महामंडळाने नेमलेल्या प्राधिकाऱ्याचे समाधान केले पाहिजे आणि इतर सर्व बाबतीत, रक्कम ज्या कारणासाठी काढून घेण्यात आली त्या कारणासाठी तिचा विनियोग करण्यात आला याविषयी याबाबत निर्दिष्ट केलेल्या मुदतीत मंजुरी प्राधिकाऱ्याचे समाधान केले पाहिजे आणि असे करण्यात त्याने कसूर केल्यास अशा रीतीने काढून घेतलेली सबंध रक्कम किंवा ती ज्या कारणासाठी काढून घेण्यात आली त्या कारणासाठी जेवढ्या रकमेचा विनियोग करण्यात आला नाही तेवढी रक्कम सदस्याने विनियम १९(४) अनुसार निर्धारित केलेल्या दराने होणाऱ्या व्याजासह एका ठोक रकमेत ताबडतोब परत केली पाहिजे आणि अशा रीतीने रक्कम परत करण्यात कसूर केल्यास, ती त्याच्या वेतनातून एका ठोक रकमेत किंवा मंजुरी प्राधिकारी निर्धारित करील इतक्या मासिक हप्त्यांमध्ये वसूल करण्याचा आदेश मंजुरी प्राधिकाऱ्याने दिला पाहिजे.



(क) घर बांधण्यासाठी किंवा खरेदी करण्यासाठी रक्कम काढून घेण्याच्या बाबतीत सदस्याने प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबर रोजी किंवा तत्पूर्वी प्रपत्र क्रमांक ७ अनुसार एक वार्षिक प्रतिज्ञापत्र सादर केले पाहिजे.

(७) ज्या सभासदाने ह्या विनियमाचा पोट-विनियम (१) मधील खंड (अ), (ब) व (क) यामध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणासाठी विनियम १९ अन्वये आगाऊ रक्कम आधीच काढलेली असेल किंवा त्यासाठी अर्ज केला असेल त्या सदस्यास रक्कम मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करून यथास्थिति मागितलेल्या आगाऊ रकमेनंतर येणे बाकी असलेली रक्कम अंतिमरीत्या काढावयाची रक्कम म्हणून समजण्यात यावे अशी विनंती करता येईल; मात्र त्याने ह्या विनियमाचा पोटनियम (१) ते (६) यामध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी पूर्ण केल्या पाहिजेत.

**२१. रक्कम प्रदान करणे.**– (१) विनियम २३ मधील तरतुदीस अधीन राहून सभसदाला-

(१) नियत वयोमानानंतर सेवानिवृत्त झाल्यानंतर;

(२) सक्षम वैद्यकीय प्राधिकाऱ्याने यथोचितरीत्या प्रामाणिक केलेल्या शारीरिक किंवा मानसिक अपंगत्वामुळे कायम स्वरूपाची व संपूर्ण असमर्थता प्राप्त झाल्याने सेवानिवृत्त झाल्यावर;

(३) आस्थापनेतील नोकरसंख्येत कपात केल्यामुळे कामावरून कमी करण्यात आल्यावर;

भविष्य निर्वाह निधीत त्याच्या खात्यावर जमा असलेली संपूर्ण रक्कम काढून घेता येईल.

(२) विनियम २३ मधील तरतुदीच्या अधीन राहून सभासदत्व संपुष्टात आल्याच्या इतर सर्व बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील:-

(१) जर भविष्य निर्वाह निधीच्या सदस्यत्वाची मुदत पाच वर्षांपेक्षा कमी असेल तर, प्राप्तीकर अधिनियम, १९६१ याचे परिशिष्ट चारमधील नियम ९चा उप-नियम (१) या अन्वये आकारण्यात येणारा कर, काही असल्यास, तो वजा करून सदस्याला त्याच्या स्वतःच्या वर्गणीची एकूण रक्कम व त्या रकमेवरील व्याज देण्यात येईल आणि महामंडळाची अंशदानाची संपूर्ण रक्कम व त्या रक्कमेवरील व्याज निधीत जमा करण्यात येईल;

[टिप. –कामावर परत घेतलेल्या सेवानिवृत्त इसमांची पुनर्नियुक्तीची मुदत एक वर्षापेक्षा अधिक असल्याने ज्यांना निधीचा सदस्य होण्यास परवानगी देण्यात आली असेल अशा सेवानिवृत्त इसमांच्या बाबतीत ह्या विनियमाच्या तरतुदी लागू असणार नाहीत.]*

(२) जर निधीच्या सदस्यत्वाची मुदत पाच वर्षे किंवा अधिक असेल तर, सदस्याला त्याच्या खात्यावर जमा असलेली सर्व रक्कम मिळण्याचा हक्क असेल.

(३) पोट-विनियम (२) अन्वये निधीत जमा करण्यात आलेली कोणतीही रक्कम निधीच्या 'राखीव खात्यात' जमा करण्यात येईल आणि महामंडळाची मान्यता घेऊन कर्मचाऱ्यांच्या सामान्य हितसंबंधाची व फायद्याची जी उद्दिष्टे, मंडळ ठरवील त्या उद्दिष्टांसाठी त्या रकमेचा विनियोग करण्यात येईल.

[ ]* ठराव क्र. १७

(४) धरील पोट-विनियम (३) अन्वये कोणत्याही सदस्यास मिळणारा कोणताही लाभ हा आयकर अधिनियमानुसार करपात्र असेल.

२२. मयत सदस्याची जमा असलेली रक्कम कोणास द्यावयाची – (१) रक्कम अदा करण्यापूर्वी कर्मचारी मृत्यू पावल्यास कर्मचाऱ्याच्या खात्यावर जमा असलेली रक्कम विनियम २३ प्रमाणे काही रक्कम कापून घ्यावयाची असल्यास ती कापून घेतली जाण्यास पात्र राहून, खाली दर्शविल्याप्रमाणे चुकती करण्यात येईल:-

(२) कर्मचाऱ्याच्या मागे त्याचे कुटुंब असेल तर–

(१) विनियम १८ मधील तरतुदीनुसार कर्मचाऱ्याने आपल्या कुटुंबातील एक किंवा अधिक इसमांच्या नावे नामनिर्देशनपत्र केलेले असेल तर, निधीत त्याच्या खात्यावर जमा असलेली रक्कम किंवा नामनिर्देशनाशी संबंधित असेल तेवढा त्या रकमेचा भाग, अशा एका किंवा अनेक नामनिर्दिष्ट इसमांस नामनिर्देनपत्रामध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रमाणात देण्यात येईल.

(२) जर कर्मचाऱ्याच्या कुटुंबातील एका किंवा अधिक इसमांच्या नावे केलेले असे नामनिर्देशनपत्र नसेल किंवा अशा नामनिर्देशनपत्राचा संबंध निधीत त्याच्या खात्यावर जमा असलेल्या रकमेच्या फक्त काही भागाशी असेल तर, यथास्थिति ती संबंध रक्कम किंवा त्या रकमेच्या ज्या भागाशी नामनिर्देशनपत्राचा संबंध नाही तो भाग, त्याच्या कुटुंबातील इसमांव्यतिरिक्त इतर इसमाच्या किंवा इसमांच्या फायद्यासाठी केलेले असल्याचे अभिप्रेत असलेले कोणतेही नामनिर्देशनपत्र असले तरी, त्याच्या कुटुंबातील इसमांना सारख्या प्रमाणात देण्यात येईल;

मात्र असे की,–

(अ) जर कुटुंबातील दुसरा कोणताही इसम असेल तर पुढील इसमांना कोणताही हिस्सा मिळणार नाही:-

(१) कर्मचाऱ्याचा सज्ञान मुलगा;

(२) कर्मचाऱ्याच्या मयत मुलाचा सज्ञान मुलगा;

(३) पती हयात असलेली कर्मचाऱ्याची विवाहित मुलगी;

(४) कर्मचाऱ्याच्या मयत मुलाची पती हयात असलेली विवाहित मुलगी.

(ब) खंड (अ) मध्ये काहीही असले तरी कर्मचाऱ्यांचा मयत मुलगा जर कर्मचाऱ्याच्या पश्चात हयात असता तर त्याला जो हिस्सा मिळाला असता त्या हिश्श्याचा समान वाटा कर्मचाऱ्याच्या मयत मुलाची विधवा व मूल यांना मिळेल.

(३) जर कर्मचाऱ्याच्या पश्चात त्याचे कुटुंब हयात नसेल आणि

(अ) विनियम १८ मधील तरतुदीनुसार त्याने एखाद्या इसमाच्या किंवा इसमांच्या फायद्यासाठी नामनिर्देशनपत्र केलेले असेल तर, निधीत त्याच्या नावे शिल्लक असलेली रक्कम त्याने नामनिर्दिष्ट केलेल्या इसमास किंवा इसमांना नामनिर्देशनपत्रामध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रमाणात देण्यात येईल आणि



(ब) विनियम १८ मधील तरतुदीनुसार त्याने नामनिर्देशनपत्र केलेले नसेल किंवा अशा नामनिर्देशनपत्राचा त्याच्या नावे निधीत जमा असलेल्या रक्कमेच्या फक्त काही भागाशी संबंध असेल तर, पूर्वोक्त बाबतीत ती संबंध रक्कम आणि उपरोक्त बाबतीत उरलेली रक्कम तिच्यावर कायदेशीर हक्क असलेल्या इसमास देण्यात येईल;

(४) ह्या विनियमांनुसार ज्या इसमास रक्कम द्यावयाची असेल तो इसम अज्ञान किंवा वेडसर असेल आणि त्याच्या मालमत्तेसाठी यथस्थिति पालक व पाल्य अधिनियम, १८९० (१८९० चा ८वा) या अन्वये पालक, किंवा भारतीय वेडेपणाबाबत अधिनियम, १९१२ (१९१२ चा ४ था) या अन्वये व्यवस्थापक नेमण्यात आलेला असेल तर सदरहू रक्कम अशा पालकास किंवा व्यवस्थापकास दिली पाहिजे. जर अशाप्रकारे पालक किंवा व्यवस्थापक नेमण्यात आलेला नसेल आणि अशी रक्कम रुपये ५०० पेक्षा अधिक नसेल किंवा रक्कम रुपये ५०० पेक्षा अधिक असेल परंतु रुपये १००० पेक्षा अधिक नसेल तर यथास्थिति अशा अज्ञान किंवा वेडसर इसमाचा प्रतिनिधी म्हणून योग्य व्यक्ती असल्याचे पूर्वोक्त बाबतीत चिटणीसास वाटेल त्या किंवा उपरोक्त मंडळास वाटेल त्या व्यक्तीस सदरहू रक्कम देण्यात येईल. आणि अशारीतीने रक्कम दिल्याबद्दल अशा इसमाने दिलेल्या पावतीमुळे अशी रक्कम देण्याच्या जबाबदारीतून पुरेशी मुक्तता होईल.इतर कोणत्याही बाबतीत, अज्ञात इसमाच्या किंवा वेडसर इसमाच्या वतीने अशी रक्कम स्वीकारण्याचा अधिकार असलेल्या इसमास ती रक्कम दिली पाहिजे.

(५) मयत कर्माचाऱ्यास त्याच्या मृत्यूनंतर मूल होणार आहे असे चिटणीसाच्या नजरेस आणून दिले असेल तर मूल जिवंत जन्माला आल्यास त्याला अखेरीस देय असेलतेवढी रक्कम ठेवून घेईल आणि बाकीची रक्कम वाटून टाकील. जर नंतर मूल जन्मास आले नाही किंवा मृतावस्थेत जन्मास आले तर ह्या विनियमाचा पोट-विनयम २ चे खंड (ब) मधील तरतुदीनुसार ठेवून घेतलेली रक्कम वाटून टाकण्यात येईल. तथापि जर एकापेक्षा अधिक मुले कर्मचाऱ्याच्या मृत्यूनंतर जन्मास आली तरच फक्त राखून ठेवलेली बाकीची रक्कम मरणोत्तर जन्मलेल्या अशा मुलांना वाटून देण्यात येईल.

२२. (अ) (१) निधीचा सभासद असलेल्या कोणत्याही इसमाच्या खात्यावर जमा असलेली रक्कम दुसऱ्याच्या नावे केली जाण्यास किंवा तिच्यावर बोजा निर्माण केला जाण्यास पात्र असणार नाही तसेच ती सभासदाने काढलेले कोणतेही कर्ज किंवा त्याच्यावर असलेले उत्तरदायित्व याच्या बाबतीत कोणत्याही शासनाचा कोणताही हुकुमनामा किंवा आदेश यानुसार जप्त केली जाण्यास पात्र असणार नाही आणि 'प्रसिडेन्सि टाऊन्स इन्सॉल्व्हन्सी ॲक्ट, १९०९', यानुसार नेमलेला शासकीय अभिहस्तांकित किंवा 'प्रॉव्हिन्शियल इन्सॉल्व्हन्सी ॲक्ट १९२०', यानुसार नेमलेला कोणताही रिसिव्हर यास अशी कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असणार नाही किंवा तिच्यावर कोणत्याही प्रकारे दावा सांगता येणार नाही.

(२) निधीच्या सभासदाच्या मृत्यूच्या वेळी त्याच्या नावावर असलेली आणि विनियम १८ अन्वये त्याने नामनिर्दिष्ट केलेल्या इसमास देय असलेली कोणतीही रक्कम, सदरहू

विनियमान्वये प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही कपातीस अधीन राहून नामनिर्दिष्ट केलेल्या इसमाच्या मालकीची होईल. आणि ही रक्कम मयत सदस्याने किंवा नामनिर्दिष्ट केलेल्या इसमाने सदस्याच्या मृत्युपूर्वी काढलेले कोणतेही कर्ज किंवा पत्करलेले इतर दायित्व यापासून मुक्त राहील.ट

**२३. सदस्यत्व संपल्यावर कापून घ्यावयाच्या रकमा.**– (१) विनियम २१ मध्ये काहीही असले तरी, एखाद्या कर्मचाऱ्यास सेवेतून बडतर्फ करण्यात आल्यास त्याच्या अंशदानाची रक्कम व त्याच्या सबंध सेवेच्या काळातील त्या रकमेवरील व्याज किंवा त्याचा काही भाग जप्त करण्याचा आदेश मंडळास देण्याचा अधिकार महामंडळास आहे आणि मंडळाने अशा आदेशाचे पालन केले पाहिजे.

(२) विनियम २१ मध्ये काहीही असले तरी, जेव्हा निधीच्या कोणत्याही सदस्याच्या नावे जमा असलेली रक्कम कोणत्याही कारणामुळे देय झाली असेल तर महामंडळाने तसा आदेश दिल्यास, अशाप्रकारे देय असलेल्या रकमेतून महामंडळाने मागणी केलेली कोणतीही रक्कम महामंडळाच्या सदस्याकडून महामंडळाला येणे असलेली रक्कम समजून मंडळाने कापून घेतली पाहिजे आणि महामंडळास दिली पाहिजे; मात्र असे की, अशा प्रकारे कापून घेण्यात यावयाची रक्कम कोणत्याही परिस्थितीत सदस्याच्या नावावर जमा असलेली महामंडळाच्या अंशदानाची एकूण रक्कम व त्या रकमेवरील व्याज यापेक्षा अधिक असता कामा नये.

**२४. भविष्य निर्वाह निधीची रक्कम अंतिमरीत्या प्रदान करण्याची कार्यपद्धती.**– (१) जेव्हा सदस्याच्या नावावर जमा असलेली रक्कम किंवा विनियम २३ अन्वये कोणतीही रक्कम कापून घेतल्यावर शिल्लक राहिलेली रक्कम देय होईल त्यावेळी सदस्याचे खाते बंद करण्यात आले पाहिजे आणि देय रक्कम निर्दिष्ट केलेली लेखी नोटीस सभासदत्व संपुष्टात आल्यापासून एक महिन्याच्या आत पैसे मिळण्याचा हक्क असलेल्या इसमास देण्यात आली पाहिजे. जर सभासद मृत्यू पावला असेल आणि ह्या विनियमानुसार नामनिर्देशन करण्यात आलेले नसेल आणि निधीत त्याच्या खात्यावर जमा असलेली रक्कम रुपये ५०० पेक्षा अधिक नसेल तर, मागणी करणाऱ्याच्या हक्काबाबत मंडळाचे समाधान झाल्यास अशी रक्कम मागणी करणाऱ्या इसमास देण्यात येईल.

(२) देय झालेल्या रकमेच्या कोणत्याही भागाबद्दल शंका किंव वाद निर्माण झाला तर, रकमेच्या ज्या भागसंबंधी शंका किंवा वाद नसेल तेवढा भाग मंडळ देऊन टाकील.

(३) ह्या नियमान्वये पैशावर हक्क सांगू इच्छिणाऱ्या कोणत्याही इसमाने मंडळाकडे किंवा मंडळाने निर्दिष्ट केलेल्या प्राधिकाऱ्याकडे अर्ज केला पाहिजे आणि ज्याला पैसे द्यावयाचे त्या इसमाच्या इच्छेनुसार मंडळ किंवा तो प्राधिकारी–

(१) ज्यास पैसे द्यावयाचे त्या इसमाच्या खर्चाने पोस्टाने मनिऑर्डर पाठवू,

(२) पोस्टाने पाठविलेल्या रेखित चेकद्वारे, किंवा



(३) ज्यास पैसे द्यावयाचे त्या इसमास बँकेतील खात्यात, असल्यास, रक्कम जमा करून, पैसे चुकते करील.

**२५. वार्षिक अहवाल.**-- प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यापासून ९ महिन्यांच्या आत महाराष्ट्र औद्योगिक महामंडळाच्या कर्मचाऱ्याच्या अंशदान भविष्य निर्वाह निधी विनियमनाच्या कामकाजासंबंधी लगत पूर्वीच्या वित्तीय वर्षातील कार्यवाही सबंधीचा अहवाल मंडळाने महाराष्ट्र शासनाला तसेच महामंडळाला सादर केला पाहिजे.

**२६. अमानत म्हणून ठेवलेल्या वस्तू वगैरे विकण्याचा मंडळाचा अधिकार.**– ह्या विनियमाच्या तरतुदीनुसार जेवढी रक्कम देय असे तेवढी रक्कम, ती मिळण्याचा हक्क असलेल्या इसमांना मंडळाने वेळोवेळी दिली पाहिजे. आणि आवश्यक असल्यास मंडळाने धारण केलेले कर्जरोखे किंवा त्यांचा आवश्यक तेवढा भाग विकून अगर त्या कर्जरोख्याच्या तारणावर कर्ज काढून त्या कारणासाठी आवश्यक तेवढी रक्कम उभी केली पाहिजे.

**२७. बँकेतील खाते.**– विनियम १५ चा उप-विनियम ६ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बँकेत मंडळ खाते उघडील आणि मंडळाच्या कोणत्याही दोन सदस्यांना– त्यापैकी एक सदस्य अध्यक्ष आणि त्याच्या गैरहजेरीत महामंडळाने नियुक्त केलेला विश्वस्त असेल– या खात्याचा व्यवहार संयुक्त रीत्या चालविता येईल.

**२८. विश्वस्त आपल्या स्वत:च्या कसूरीबद्दल जबाबदार राहील.**– कोणत्याही विश्वस्ताने कोणत्याही पावतीवर शिरस्ता म्हणून किंवा अन्यथा स्वाक्षरी केली असली तरी त्याला प्रत्यक्ष मिळालेल्या पैशांव्यतिरिक्त इतर बाबतीत तो जबाबदार असणार नाही किंवा ती रक्कम त्याचेकडून वसूल केली जाण्यास पात्र असणार नाही. तसेच निधीचे पैसे ज्या बँकेत ठेवले असतील त्या बँकेची कृत्ये कसूरी किंवा हयगय याबद्दल त्याचप्रमाणे कोणतीही नुकसानी त्याच्या स्वत:च्या हेतुपुरःसर कृत्यामुळे किंवा वर्तनामुळे झाली असेल ते खेरीज करून अशा नुकसानीबद्दल तो जबाबदार असणार नाही किंवा तिची भरपाई केली जाण्यास पात्र असणार नाही.

**२९. निर्वचन.**– ह्या नियमाचा अर्थ लावण्याचा हक्क महामंडळाने स्वत:कडे राखून ठेवला आहे.

**३०. विश्वस्तांची क्षतिपूर्ती.**– प्रत्येक विश्वस्ताला, त्याच्या हयगयीमुळे किंवा लबाडीमुळे निर्माण झालेला नाही अशा निधीसंबंधीच्या कोणत्याही दाव्याच्या संबंधात करण्यात आलेली कोणतीही कारवाई व खर्च यामुळे त्याचे जे नुकसान झाले असेल त्याबद्दल निधीतून भरपाई मिळण्याचा हक्क असेल.

**३१. कायम स्वरूपाची बदली होऊन आलेले शासकीय कर्मचारी किंवा इतर संस्थापित मंडळांतील कर्मचारी.**– शासनातील किंवा इतर संस्थापित मंडळतील कर्मचाऱ्याची कायम स्वरुपाची बदलीहोऊन महामंडळाकडे नेमणूक झाली असेल तर यापूर्वी त्याला लागू

असलेल्या योजनेखालील भविष्य निर्वाह निधीत त्याच्या खात्यावरील शिल्लक रक्कम, असल्यास मंडळाच्या मान्यतेस अधीन राहून तो/ती निधीचा सभासद झाल्यावर निधीतील त्यांच्या खात्यावर घेण्यात येईल.

[ ३१.अ. एखाद्या सभासदाची कायम स्वरूपाची बदली होऊन शासनाकडे किंवा इतर संस्थापित मंडळाकडे नेमणूक झाली असेल आणि त्या ठिकाणी तसाच अंशदानी भविष्य निर्वाह निधी अस्तित्वात असेल तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या अंशदानी भविष्य निर्वाह निधीत त्याच्या/तिच्या खात्यातील शिल्लक रक्कम, असल्यास विश्वस्त मंडळाच्या मान्यतेस पात्र राहून तो/ती, त्या निधीचा सभासद झाल्यावर शासनाच्या किंवा इतर संस्थापीत मंडळाच्या निधीतील त्याच्या तिच्या खात्यात जमा करण्यासाठी स्थानांतरित करण्यात येईल. असा बाबतीत विनियम २१ (२) (१) मधील तरतुदी लागू असणार नाहीत आणि सभासदाच्या खात्यातील शिल्लक रक्कम मंडळाच्या संपूर्ण अंशदानासह स्थानांतरित करण्यात येईल.]*

३२. **विनियमातील फेरबदल.**– महामंडळाला ह्या विनियमांच्या कोणत्याही तरतुदीत त्याला योग्य वाटेल अशा रीतीने वेळोवेळी भर घालणे, सुधारणे, फेरफार करणे किंवा रद्द करणे यासंबंधीचा अधिकार आहे; मात्र अशा गोष्टीमुळे निधीच्या मूळ हेतूस कोणत्याही प्रकारे बाध येता कामा नये.

---

[ ]* ठराव क्र. २०



**नमुना क्र. १**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी**

(विनियम १३ पहा )

मी याद्वारे जाहीर करतो की. मी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कर्मचारी अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी विनियम, १९६८ वाचले असून त्यांचा आशय मला समजला आहे आणि भविष्य निर्वाह निधीची वर्गणी भरण्याचे मी याअन्वये कबूल करतो आणि उक्त विनियम माझ्यावर बंधनकरक असल्याचे मान्य करतो.

साक्षीदार ——————— संपूर्ण सही ———————

नाव ———————

पत्ता ———————

दिनांक ———————

नमुना

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या

(विनियम

व्यक्तिगत खात्याचा हिशेब

नाव ———————— हुद्दा ————————

| वर्ष व महिना | दिलेले वेतन व भत्ता | कर्मचाऱ्यांची वर्गणी | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सक्तीची वर्गणी | ऐच्छिक वर्गणी | आगाऊ रकमेची परत फेड | एकूण |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | रुपये | रुपये | रुपये | रुपये | रुपये |
| आरंभीची शिल्लक .. | | | | | |
| एप्रिल .. | | | | | |
| मे .. | | | | | |
| जून .. | | | | | |
| जुलै .. | | | | | |
| ऑगस्ट .. | | | | | |
| सप्टेंबर .. | | | | | |
| ऑक्टोबर .. | | | | | |
| नोव्हेंबर .. | | | | | |
| डिसेंबर .. | | | | | |
| जानेवारी .. | | | | | |
| फेब्रुवारी .. | | | | | |
| मार्च .. | | | | | |
| एकूण ... | | | | | |



क्र. २

कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी

१७ पहा)

लेखा क्रमांक ————————

विधीचा सभासद झाल्याचा दिनांक ————————

| महामंडळाचे अंशदान | | | | इतर तपशील : |
|---|---|---|---|---|
| मंजूर कलेली आगाऊ रक्कम | वाढती बाकी | अंशदान | वाढती बाकी | ................ |
| ७ | ८ | ९ | १० | मागील वर्षातील येणे बाकी |
| | | | | १. आगाऊ रक्कम रुपये. |
| | | | | २. आगाऊ रक्कम रुपये. |
| | | | | चिटणीस |
| | | | | मंजूर झालेली आगाऊ रक्कम रुपये ............ |
| | | | | रु. ............... चा एक |
| | | | | याचप्रमाणे ............... |
| | | | | .........हप्त्यात वसूल करण्यायोग्य |
| | | | | चिटणीस. |
| | | | | दिले, रो. क्र. क्रमांक |
| | | | | ................ |

गोषवारा

कर्मचाऱ्याची वर्गणी (रु पै. रु पै.)

दि. १ एप्रिल १९६७ रोजी शिल्लक .. .................... पुढे आणली ..............

वर्षात भरलेली वर्गणी .. .................... ..............

आगाऊ रक्कमेची परतफेड .. .................... ..............

वर्षाचे व्याज .. .................... ..............

एकुण ..

वजा (१) दिलेली आगाऊ रक्कम ..........................................

(२) इतर निधीत । महामंडळाकड ..................................

हस्तांतरित कलेली रक्कम रु

दिनांक ३१ मार्च १९७.........रोजी अखेरची शिल्लक .............. पुढे नेली ........................

मालकाचे अंशदान

दि. १ एप्रिल १९.......... रोजी शिल्लक ........................... पुढे आणली ..........................

वर्षात दिलेली अंशदान .. .................... ..............

वर्षाचे व्याज .. .................... ..............

वजा इतर निधीत । महांडळाकडे हस्तांतरित केलेली रक्कम रु ................................

दि. ३१ मार्च १९ .......... रोजी अखेरची शिल्लक पुढे नेली ........................

एकूण बेरीज ..

---

परत फेड करावयाच्या आगाऊ रकमेचा ज्ञाप लेखा

महिना व वर्ष : भरलेली रक्कम रुपये

विश्वस्त मंडळाचे चिटणीस

अंतिम प्रदानाचा गोषवारा

१. खाते बंद केले (तारीख——)

२. "सेवानिवृत सदस्याच्या खाती "
हस्ता तरित केलेली रक्कम.

३. कर्मचाऱ्यास । नामनिर्देशित
व्यक्तीस दिलेली रक्कम वर्गणी
रु अंशदान रु

....................

एकुण ....................

४. विश्वस्त निधीच्या राखीव हिशेब
खाती व्यपगत झालेली
रक्कम रु ....................



रक्कम

रुपये

---

केलेले काम | आद्याक्षरी

खाते नोंद केली ..................................................

मासिक रकमांचा हिशोब केला ..................................

मासिक रकमांच्या बरेजा केल्या ..............................

वर्गणी व अंशदानावरील व्याजाचा हिशोब केला ..............

गोषवारे लिहून काढले ...............................................

वर्गणीवरील व्याजाचा हिशोब तपासला ........................

अंशदानावरील व्याजाचा हिशोब तपासला ......................

गोषवारा तपासला .....................................................

..............................

नमुना

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या

(विनियम

सन १९ —१९ या वर्षाच्या

व्याजाचा दर : द. सा.

वर्गणीदाराचे नांव : — श्री./श्रीमती/कु.

| अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधि लेखा क्रमांक १ | तपशील २ | दि. १-४-१९ रोजी खात्यावर असलेलली सुरुवातीची शिल्लक ३ | | वर्षात जमा झालेल्या रकमा ४ | | वर्षात मिळालेले व्याज ५ | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | रुपये | पै. | रुपये | पै. | रुपये | पै. |
| | कर्मचाऱ्याने भरलेली वर्गणी. | | | | | | |
| | महामंडळाने दिलेले अंशदान | | | | | | |
| | एकूण .. | | | | | | |

टीप १. वर्गणदाराने वरील विवरणपत्र बरोबर असल्याची खात्री करुन घ्यावी आणि त्यास विवरणपत्रात (जर कोणत्याही) चुका आढळून आल्यास त्या दाखवून देऊन, प्रस्तुत विवरणपत्राची दुसरी प्रत यथोचितरीत्या स्वाक्षरित करुन ती मंडळाच्या चिटणिसाकडे विवरण पत्र त्यास मिळाल्या पासून दोन महिन्याच्या आत परत करावी.

२. वर्गणीदाराने यापूर्वीच नामनिर्देशन केलेले नसेल तर ते त्याने लगेच ठ रविलेल्या नसुन्यात करावे अशी त्यास विनंती आहे.

सदस्याची सही..............................



क्र. ३

कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी

१७ पहा)

हिशोबाचा वार्षिक गोषवारा

द. शे. ..........................................

..........................................................

| स्तंभ क्र. ३, ४ व ५ ची बेरीज ६ | | वर्षात खात्यातून काढून घेतलेल्या रकमा ७ | | दि. ३१-३-१९ रोजी खात्यावर असलेली अखेरची शिल्लक ८ | | शेरा ९ |
|---|---|---|---|---|---|---|
| रुपये | पै. | रुपये | पै. | रुपये | पै. | |
| | | | | | | |
| | | | | | | |

सही ..................................................

तारीख ...................... १९ ..........

अधिकाऱ्याचे पदनाम..........................................

## नमुना क्र. ४

(कुटुंब असलेल्या सदस्यांच्या उपयोगासाठी)

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी

(विनियम १८ पहा )

मी, निधीतील माझ्या नावे जमा झालेली रक्कम, ती देय होण्यापूर्वी मी मरण पावल्यास अथवा ती देय होऊन चुकती केलेली नसल्यास ती घेण्यासाठी खालील नमूद केलेल्या व्यक्तीस अथवा व्यक्तींना याद्वारे नामनिर्दिष्ट करित आहे आणि असा निर्देश देतो की, उक्त रक्कम ही उक्त व्यक्तींना खाली त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या रितीने वाटली जावी : -

| नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचे अथवा व्यक्तींचे नाव व पत्ता | नामनिर्दिष्ट व्यक्तींचे सदस्याशी असलेले नाते | नामनिर्दिष्ट व्यक्तींचे वय | जर नामनिर्दिष्ट व्यक्ती एकापेक्षा अधिक असतील तर प्रत्येक नामनिर्दिष्ट व्यक्तीस निधीत जमा झालेल्या रकमेचा हिस्सा म्हणून द्यावयाची रक्कम * | कोणते आकस्मिक प्रसंग घडल्यास नामनिर्दिशन विधिबाह्य ठरेल | नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती वर्गणीदाराच्या पूर्वी मरण पावल्यास नामनिर्दिष्ट व्यक्तीचे हक्क जिच्याकडे जातील अशा कोणा व्यक्तीचे, असल्यास, संपूर्ण नाव, पत्ता व वर्गणीदाराशी नाते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

सदस्याची सही अथवा डाव्या हाताच्या अंगठ याची निशाणी ..................................

तारीख ..............................



प्रमाणित करण्यात येते की, महामंडळाच्या नोकरीत असलेले श्री. .................................. .......................... यांनी नोंदी वाचल्यानंत माझ्या समक्ष वरिल प्रतिज्ञापनावर सही केली आहे / ........................................................ नमुन्यातील नोंदी मी त्यांना वाचून दाखविल्या आहेत.

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही ..................................

पदनाम ........................................................

नाव व पत्ता ....................................................

टिप. - १. जर एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्दिष्ट केले असेल तर निधीत कोणत्याही वेळी वर्गणीदाराच्या नावे जी रक्कम जमा झाली असेल त्या संपूर्ण रकमेचा समावेश होईल अशा रीतीने प्रस्तुत स्तंभ भरावा.

२. नामनिर्दिष्ट व्यक्ती अज्ञान असेल, तिचा पालक वर्गणीदाराव्यतिरिक्त अन्य व्यक्ती तर पालकाचे संपूर्ण नाव व पत्ता नमूद केला पाहिजे.

नमुना क्र. ५

(कुटुंब असलेल्या सदस्यांच्या उपयोगासाठी)

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी**

नामनिर्देशनाचा नमुना

(विनियम १८ पहा )

मी, ............................................................ अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी लेखा क्र. ........................... ह्यास / हीस, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीविषयक विनियम यांतील २ मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे कोणतेही कुंटुंब नसल्यामुळे याद्वारे निधीत माझ्या नावे जी रक्कम जमा होईल ती देय होण्यापूर्वी मी मरण पावल्यास, अथवा ती देय झाल्यानंतर चुकती केलेली नसल्यास ती घेण्यासाठी म्हणून खाली नमूद केलेल्या व्यक्तीस नामनिर्दिष्ट करीत आहे आणि मी असा निदेश देतो की, उक्त रक्कम ही उक्त व्यक्तींना खाली त्यांचा नावांसमोर दर्शविलेल्या रीतीने वाटली जावी :-

| नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचे अथवा व्यक्तींचे संपूर्ण नाव व पत्ता | वर्गणीदाराशी असलेले नाते | नामनिर्दिष्ट व्यक्तींचे वय | जर नामनिर्दिष्ट व्यक्ती एकापेक्षा अधिक असतील तर प्रत्येक नामनिर्दिष्ट व्यक्तीस निधीत जमा झालेल्या रक्कमेचा हिस्सा म्हणून द्यावयाची रक्कम | कोणते आकस्मिक प्रसंग घडल्यास नामनिर्दिशन विधिबाह्य ठरेल | नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती वर्गणीदाराच्या पूर्वी मरण पावल्यास नामनिर्दिष्ट व्यक्तीचे हक्क जिच्याकडे जातील अशा कोणी व्यक्तीचे, असल्यास, संपूर्ण नाव, पत्ता व वर्गणीदाराशी नाते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

(१) **आवश्यक :** यानंतर मी कुटुंब संपादन केल्यास हे नामनिर्देशन विधिबाह्य ठरेल.

(२) ............................................................



सदस्याची सही अथवा डाव्या हाताच्या अंगठयाची निशाणी ..................................

तारीख ..............................

---

प्रमाणित करण्यात येते की, महामंडळाच्या नोकरीत असलेले श्री. ..................................
........................ यांनी नोंदी वाचल्यानंतर माझ्या समक्ष वरिल प्रतिज्ञापनावर सही केली आहे / ............................................................ नमुन्यातील नोंदी मी त्यांना वाचून दाखविल्या आहेत.

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही ..................................

पदनाम ..................................

तारीखे ..................... नाव व पत्ता ..................................

टिप. - १. जर एकापेक्षा अधिक व्यक्तींना नामनिर्दिष्ट केले असेल तर निधीत कोणत्याही वेळी वर्गणीदाराच्या नावे जी रक्कम जमा झाली असेल त्या संपूर्ण रकमेचा समावेश होईल अशा रीतीने प्रस्तुत स्तंभ भरावा.

२. नामनिर्दिष्ट व्यक्ती अज्ञान असेल, तिचा पालक वर्गणीदाराव्यतिरिक्त अन्य व्यक्ती असेल तर पालकाचे संपूर्ण नाव व पत्ता नमूद केला पाहिजे.

नमुना क्र. ६

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या कर्मचाऱ्यांचा भविष्य निर्वाह निधी

(विनियम १८ पहा)

मी, ............................................................ माझा मृत्यू झाल्यास निधीत माझ्या नावे जमा असलेल्या रकमेच्या विल्हेवाटीच्या संबधात ........................ रोजी केलेले नामनिर्देशन पत्र याद्वारे रद्द करीत आहे. व निधीत माझ्या नावे जमा असलेली रक्कम देण्याजोगी होण्यापूर्वी किंवा देण्याजोगी होऊन देण्यात आली नसता माझा मृत्यू झाल्यास ती ज्यास मिळावी त्या खाली निर्दिष्ट केलेल्या इसमास किंवा इसमास नामनिर्दिष्ट करीत आहे. आणि असा निदेश देत आहे की सदरहू रक्कम सदरहू इसमामध्ये त्यांच्या नावासमोर खाली निर्दिष्ट केलेल्या रीतीने वाटून देण्यात यावी :

| नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तीचे अथवा व्यक्तींचे नाव व पत्ता | नामनिर्दिष्ट व्यक्तींचे सदस्याशी असलेले नाते | नामनिर्दिष्ट व्यक्तींचे वय | नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्ती एकापेक्षा अधिक असल्यास तर प्रत्येक नामनिर्दिष्ट व्यक्तीस निधीत जमा झालेल्या रकमेचा हिस्सा म्हणून द्यावयाची रक्कम * | कोणते आकस्मिक प्रसंग घडल्यास नामनिर्देशन विधिबाह्य ठरेल | नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती वर्गणीदाराच्या पूर्वी मरण पावल्यास नामनिर्दिष्ट व्यक्तीचे हक्क जिच्याकडे जातील अशा व्यक्तीचे, कोणी असल्यास, संपूर्ण नाव, पत्ता व वर्गणीदाराशी नाते |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| | | | | | |

सदस्याची सही किंवा डाव्या हाताच्या अंगठयाचा ठसा ........................................

तारीख ..............................



प्रमाणपत्र देण्यात येते की वरील प्रतिज्ञापत्रावर महामंडळाच्या सेवेत असलेले श्री. ....... ..............................................यांनी त्यातील नोंदी वाचल्यानंतर माझ्या समक्ष सही केली आहे.

अधिकृत अधिकाऱ्याची सही ..................................

हुद्दा ..................................................

नाव व पत्ता ..........................................................

* टिप. - १. नामनिर्दिष्ट केलेले इसम एकापेक्षा अधिक असल्यास कोणत्याही वेळी निधीत वर्गणीदाराच्या नावे जमा असलेली सर्व रक्कम अंतर्भूत होईल अशा रीतीने हा स्तंभ भरावा.

२. नामनिर्दिष्ट केलेला इसम अज्ञान असेल आणि त्याचा पालक वर्गणीदाराव्यतिरिक्त इतर इसम असेल तर त्या पालकाचे संपूर्ण नाव व पत्ता नमूद करावा.

नमुना क्र. ७

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य विर्वाह निधी

वार्षिक प्रतिज्ञापनाचा नमुना

(विनियम २० (६) (क) पहा)

मी, याद्वारे असे प्रतिज्ञापन करतो की, निधीत माझ्या नावे जमा असलेल्या रकमेतून काढलेल्या रकमेने मी बांधलेला/खरेदी केलेला प्लॉट मी, रक्कम मंजूर करणाऱ्या प्राधिकऱ्याने लेखी दिलेल्या पूर्व संमतीवाचून विक्री, गहाण, अदलाबदल करून किंवा देणगी म्हणून देऊन किंवा तीन वर्षापेक्षा अधिक मुदतीच्या भाडेपट्ट्याने देऊन किंवा इतर कोणत्याही प्रकारे हस्तांतरित केलेला नाही आणि तसे करण्यास सांगण्यास आल्यास, घर सर्वस्वी माझ्या एकट्याच्याच मालकीचे आहे हे दर्शविणाऱ्या कराच्या पावत्या, मालकीहक्कांचे कागदत्र आणि रक्कम मंजूर करणारे उक्त प्राधिकारी विनिर्दिष्ट करतील असे इतर दस्तऐवज सादर करण्याची मी हमी देतो.

दिनांक माहे सन १९

साक्षीदार :
(पत्यासहीत)

(१) ..................................................
..................................................

(२) ..................................................
..................................................

सही : ..........................

हूद्दा : ..........................



नमूना क्र. ८

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी

अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधितील शिल्लक रक्कम अखेर कायमची काढून घेण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

(विनीयम २४ पहा)

मुख्य कार्यकरी अधिकारी,
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई यांस
योग्य मार्गाने प्रस्तुत.

महोदय,

मी, श्री./श्रीमती .................................................. मंडळाच्या सेवेतून दिनांक .................................................. पासून मुक्त होत/झालो असल्याकारणाने माझ्या अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीतील रकमेचा अंतिम हिशोब करण्यात यावा अशी मी आपणास विनंती करीत आहे. आवश्यक तो तपशील खाली देत आहे.

१. मी शेवटी धारण केलेल्या पदाचे नाव ..................................................
२. अं. भ. नि. नि. खाते क्र. ..................................................
३. मी शेवटी जेथे काम करीत होतो त्या कार्यालयाचे नाव ..................................................
..................................................
४. नेमणुकीची तारीख ..................................................
५. मुक्त केल्याची तारीख व त्याचे कारण ..................................................
६. पत्रव्यवहारासठी आणि/किंवा रक्कम देण्यासाठी तयार झाल्यावर ती पाठविण्यासीठी सध्याचा पत्ता ..................................................
..................................................
..................................................
७. सदरहू रक्कम मला चेकने/मनी ऑर्डरने/रोख* द्यावी (मी ती .................. .................. येथील मंडळाच्या कार्यालयातून स्वतः घेऊन जाईन.)

आपला विश्वासू,

ठिकाण ..........................

सही ..................................................

तारीख ..........................

पुढील नोंदी विभागीय कार्यालयाने भरावयाच्या आहेत.
(मुख्य कार्यालयातील आस्थपना शाखेने)

८. जन्मतारीख ..............................

९. सेवानिवृत्तीची तारीख .....................

} सेवानिवृत्तीचे वय झाल्यामुळे कर्मचाऱ्यांच्या बाबतीतच ही माहिती द्यावी.

१०. अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीतून शेवटी दिलेल्या आगाऊ रकमेचा तपशील

(अ) विम्याचा हप्ता भरण्यासाठी .. रु ..............................

(ब) वरील कारणाव्यतिरिक्त ईतर कारणासाठी.. रु ..............................

(क) विनियम क्र. १९ अन्वये .. रु ..............................

११. अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीतून शेवटी कापून घेण्यास रकमेचा तपशील. रु ..............................

१२ तारीख रोजी दिलेल्या

माहे १९ या महिन्याच्या पगाराच्या बिलातून.

१३. येथे असताना तो कर्मचाऱ्याच्या भविष्य निर्वाह निधीचा सदस्य होता

१४. कर्मचाऱ्याचे महामंडळाला असलेले देणे रु

१५. खास शेरे, असल्यास

वरील तपशील संबधित कागदपत्रांशी ताडून पाहण्यात आला असून तो बरोबर आहे. उपरिनिर्दिष्ट वर्गणीदाराचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीचा पूर्ण हिशोब नियमानुसार चुकता करावा.

सही ..............................

तारीख .............................. कार्यकारी अभियंता, विभाग क्र.

मुख्यालयातील आपस्थापना अधिकरी.

---

तो कोणत्याही वेळी कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचा सदस्य नव्हता.

* लागू नसलेला मजकूर खोडावा.



नमुना क्र. ९

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ कर्मचाऱ्यांचा अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी मयत वर्गणीदाराच्या नामनिर्देशित इसमाने (इसमांनी) अथवा वैध वारसाने (वारसांनी) अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीची शिल्लक रक्कम अंतिमरीत्या काढण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना

(विनीयम २४ पहा)

प्रति

मुख्य कार्यकरी अधिकारी,

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई ६९

(कार्याकारी अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ...... विभाग यांच्या मार्फत)

महोदय,

खाली सही करणार मी/आम्ही, आपल्या महामंडळाच्या .............................. येथील कार्यलयात ........................(पदनाम) म्हणून सेवेत असलेले/असलेल्या व ........................रोजी ........................ येथे निधन पावलेले/पावलेल्या आणि निधीत खाते क्रमांक असलेले/असलेल्या श्री./श्रीमती ................................................(संपूर्ण नाव लिहावे) यांनी नामनिर्देशित केलेला इसम यांच्या कुटुंबातील इसम म्हणून आपल्या मंडळाच्या उक्त मयत कर्मचाऱ्याच्या नावे जमा असलेली अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीतील संचित रक्कम देण्याविषयी आपणास विनंती करतो

| मागणीदाराचे नाव व पत्ता | स्त्री अथवा पुरुष | वय व जन्म वर्ष | विवाहित किंवा अविवाहित | मृत इसमाशी नाते | अज्ञान इसमाच्या बाबतीत पालकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |

ती रक्कम आम्हांस आमच्या खर्चाने मनीऑर्डरद्वारे/अथवा श्री./श्रीमती .............................................. यांच्या नावे चेक लिहून कृपया द्यावी. माझ्या अथवा आमच्या उत्तम माहितीप्रमाणे मयत वर्गणीदाराच्या मृत्युनंतर त्यास मूल होणार आहे/नाही. (ही माहिती फक्त पुरुष वर्गणीदाराच्या बाबतीत भरावी.)

मी/आम्ही याद्वारे प्रतिज्ञापन करतो की, वरील तपशील माझ्या / आमच्या उत्तम माहितीप्रमाणे सत्य आहे.

मृत्यू-प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत यासोबत जोडली आहे.

आपला/आपली/आपले विश्वासू,

सही ...............................

(पुरुषांच्या बाबतीत) डाव्या
अथवा (स्त्रीच्या बाबतीत) उजव्या हाताच्या अंगठयाचा ठसा

**विशेष सूचना** - वरील अर्जावरील सह्या किंवा आंगठयाचे ठसे पुढीलपैकी कोणाही एकाने (त्याच्या कार्यालय मुद्रेसह) अनुप्रमाणित केलेले असावे

१. दंडाधिकारी किंवा जे. पी.
२. ग्रामपंचायत अध्यक्ष
३. नगरपालिका, पौरं पालिका/जिल्हा परिषद सभापती/सचिव
४. उप-अभियंत्याच्या दर्जाहून कमी नाही असा महामंडळाचा अधिकारी.

---

क्रमांक ............................... विभाग

दिनांक...............................

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुख्य कार्यालय, मुंबई यांस आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित.

अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधी खात्याचा हिशेब अखेरचा पुरा करण्यासाठी, आवश्यक माहिती खाली दिली आहे

१. नेमणुकीची तारीख

२. मयत इसमास अंशदायी भविष्य निर्वाह निधीतून आगाऊ दिलेल्या रकमेचा तपशील

(अ) विम्याचा हप्ता भरण्यासाठी - रुपये

(ब) वरील कारणाव्यतिरिक्त इतर करणासाठी — रुपये

(क) विनियम क्रमांक १९ अनुसार — रुपये

३. मयत इसमाची मंडळाच्या बाबतीत असलेली जबाबदारी — रुपये

४. अंशदानात्मक भविष्य निर्वाह निधीची शेवटी कापून ध्यावयाची रुपये —— इतकी रक्कम —————— रोजी भरली

५. इतर कोणतेही अभिप्राय :

कृपया त्वरित कार्यावाही करावी ही विनंती.

कार्यकारी अभियंता,

........................ विभाग.



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय)

जा. क्र. /मु. ले. अ./भ. नि. नि./१३७२०

मरोळ औद्योगिक क्षेत्र,
अंधेरी (पुर्व), मुंबई - ९३.
दि. २०.११.१९८७

**परिपत्रक**

महाराष्ट्र औद्योगित विकास महामंडळाच्या दि. १२ आक्टो. १९८४ रोजी झालेल्या १८९ व्या सभेमध्ये भ. नि. नि. मधून तात्पुरती व विशेष उचल करण्याचे अधिकार ठ राव क्र. २१६४ नूसार मुख्य विभाग प्रमुखांना खालील प्रमाणे देण्यात आले आहेत.

| (अ) देय याचिका मंजूर करणारे सक्षम अधिकारी | मजुरीचा मर्यादा |
|---|---|
| १. अध्यक्ष | मुख्य कार्यकारी अधिकारी व मुख्य लेखाधिकारी |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी | रु २२००/- चे वर मुळ वेतन असलेले सर्व अधिकारी |
| ३. मुख्य लेखाधिकारी | रु १६४०/- चे वर मुळ वेतन असलेले त्यांच्या खात्यातील सर्व अधिकारी |
| ४. मुख्य अभियंता | रु १६४०/- चे वर मुळ वेतन असलेले त्यांच्या खात्यातील सर्व अधिकारी |
| ५. इतर खाते प्रमुख | त्यांच्या खात्यातील सर्व कर्मचारी |
| ६. उपमुख्य लेखाधिकारी | रु १६४०/- किंवा त्यापेक्षा कमी मुळ वेतन असलेले त्यांच्या खात्यातील सर्व कर्मचारी. |
| ७. अधिक्षक अभियंता/योजना व्यवस्थापक | रु १६४०/- किंवा त्यापेक्षा कमी मुळ वेतन असलेले त्यांच्या खात्यातील सर्व कर्मचारी. |

(ब) विशेष देय याचिका मंजूर करण्याचे अधिकार वर नमुद केल्याप्रमाणे.

(अ) १ ते ५ मध्ये दाखविल्याप्रमाणे रहातील. इतर सर्वसाधारण देय याचिका मंजूरीचे अधिकार वर उल्लेखलेल्या त्यांच्या वरील सक्षम अधिका-यांना रहातील.

---

हे पुस्तक १-४-१९९८ रोजी छापण्यात आले.